**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. संजय दिनकर मगर
व श्री. धर्मराज देवबा साठे
मु. मगराचे निमगांव,ता. माळशिरस
जि. सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** विस्तार अधिकारी,
पंचायत समिती माळशिरस, ता. माळशिरस जि. सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** ग्रामसेवक,
ग्रामपंचायत मगराचे निमगाव,ता. माळशिरस, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८९०/ २०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ११.०५.२०११ |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा :-** विस्तार अधिकारी, पंचायत समिती माळशिरस, ता. माळशिरस जि. सोलापूर श्री. एस. जे. नागटिळक<br><br>**जन माहिती अधिकारी तथा :-** ग्रामसेवक, ग्रामपंचायत मगराचे निमगाव,ता. माळशिरस, जि. सोलापूर श्री. राजेंद्र भगवान खरात | |
| ४ | **माहिती :-** मागणीच्या मुळ अर्जाची (जोडपत्र - अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

वाचा:- आयोगाचा समक्रमांकाचा आदेश दि - २६/०७/२०११

सर्वश्री. संजय दिनकर मगर व धर्मराज देवबा साठे यांच्या अपिलावर राज्य माहिती आयोगाने पारित केलेल्या दि. २६.०७.२०११ च्या आदेशामधील अनु. क्रमांक २ मध्ये तत्कालीन ग्रामसेवकाच्या पदभाराबाबतच्या खुलाशासह व आयोगाच्या मौखिक आदेशानुसार दि. २०.०८.२०११ पर्यंत अहवाल सादर करणेबाबत अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती माळशिरस, ता. माळशिरस, जि. सोलापूर श्री. एस. जे. नागटिळक याना आदेशित करण्यात आले होते.

सदर आदेशास अनुसरून अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती माळशिरस, ता. माळशिरस, जि. सोलापूर श्री. एस. जे. नागटिळक यानी दि. १८.०८.२०११ च्या पत्रान्वये अहवाल सादर केला. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत मगराचे निमगाव, ता. माळशिरस, जि. सोलापूर श्री. आर. बी. चव्हाण याना दि. १२.०५.२०११ रोजी पत्र पाठवून दोन दिवसात दप्तर जमा करण्याच्या सूचना दिल्या होत्या. सदर पत्राच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत मगराचे निमगाव,ता. माळशिरस, जि. सोलापूर श्री. चव्हाण यानी सदर ग्रामपंचायतचे दप्तर माझ्या-कडे असून काही किरकोळ नोंदी घ्यावयाच्या राहिल्यामुळे सदर नोंदी घेऊन दप्तर विद्यमान ग्रामसेवकाकडे देत आहे, असे दि. १७.०५.२०११ च्या पत्रान्वये अवगत केल्याचे कागदपत्रांसह अहवालात नमूद केले आहे. अपीलकर्त्यास माहिती वेळेत दिली नसल्याने झालेल्या नुकसानांस तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत मगराचे निमगाव,ता. माळशिरस, जि. सोलापूर श्री. आर. बी. चव्हाण जबाबदार ठरतात यास्तव आयोगाचे सुधारित आदेश पुढीलप्रमाणे :-

## सुधारित आदेश

१) अपील मान्य करण्यात येत आहे,

२) अपीलकर्त्यास माहिती वेळेत न देण्यास कारणीभूत ठरलेले तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत मगराचे निमगाव,ता. माळशिरस, जि. सोलापूर श्री. आर. बी. चव्हाण यानी अपीलकर्त्यास नुकसान भरपाई म्हणून प्रतिकात्मक रू ५०००/- द्यावे. याप्रमाणे कार्यवाही करून घेण्याची

जबाबदारी अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती माळशिरस, ता. माळशिरस, जि. सोलापूर श्री. एस. जे. नागटिळक यांची राहील.

अपीलकर्त्यास माहिती त्वरित निःशुल्क पुरवून अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती माळशिरस, ता. माळशिरस, जि. सोलापूर श्री. एस. जे. नागटिळक यानी दि.५.०२.२०१२ – पर्यंत अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा,

पुणे
दि. - 7 JAN 2012

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. अनिल रेवणकर
गुरुप्रसाद, प्लॉट नं. ३४, रामनगर कॉलनी,
बावधन, स. नं. ७ + ८, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर उपअभियंता,
बांधकाम नियंत्रण व विकास योजना विभाग क्र. १,
पुणे महानगरपालिका, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता,
बांधकाम नियंत्रण व विकास योजना विभाग क्र. १,
पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२२५/२०१०/पुणे |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाची तारीख | दि. २७/१२/२०१२ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर उपअभियंता,
बांधकाम नियंत्रण व विकास योजना विभाग क्र. १,
पुणे महानगरपालिका, पुणे श्री. अनिल शिंदे

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता,
बांधकाम नियंत्रण व विकास योजना विभाग क्र. १,
पुणे महानगरपालिका, पुणे श्री. साहेबराव दांडगे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. २७/१२/२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

'महानगरपालिकेचे नगर अभियंता कार्यालय ज्या नियमावली व कायदे तरतुदीप्रमाणे कार्य करते ते सर्व कायदे, तरतुदी, नियमावली', असे नमूद करुन अपीलकर्त्यांनी ४ वर्षांच्या काळातील विशिष्ट प्रकरणातील माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी यानी विहित मुदतीत उत्तर दिले. तसेच अपीलकर्त्यास वेळोवेळी माहिती देण्यात आली असून याच संदर्भातील अपीलकर्त्याचे अपील क्र. ९३७/२००९/पुणे हे राज्य माहिती आयोगाने या पूर्वी अमान्य केले आहे, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले आहे.

जन माहिती अधिकारी यानी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ९.०१.२०१२**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. अनिस अहमद शेख
रो-हाऊस नं. २३, मे-फेअर, एलिगन्झा फेज-२,
एन.आय.बी.एम.रोड, कोंढवा खुर्द, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कुलसचिव,
महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,
म्हसरुळ, दिंडोरी रोड, नाशिक

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप कुलसचिव,
महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,
म्हसरुळ, दिंडोरी रोड, नाशिक

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | दि. १४०१/२०१०/पुणे |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाची तारीख | २७/१२/२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कुलसचिव,
महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,
म्हसरुळ, दिंडोरी रोड, नाशिक डॉ. आदिनाथ. ना. सूर्यकर

**जन माहिती अधिकारी** तथा उप कुलसचिव,
महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,
म्हसरुळ, दिंडोरी रोड, नाशिक डॉ. राजीव त्र्यंबक आहेर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. २७/१२/२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

अपीलकर्त्यांचा दि. ५/३/२०१० चा अर्ज दि. ८/३/२०१० रोजी प्राप्त झाला. दि. १९/३/२०१० च्या पत्रान्वये कळविलेले शुल्क दि. १३/४/२०१० रोजी प्राप्त झाल्यानंतर दि. १५/४/२०१० रोजी शीघ्र- टपालाद्वारे माहिती पाठविली, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पूरक कागदपत्रांसह सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले आहे. त्यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ९.०१.२०१२**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

१.श्री.भिमराव(दादा)कडाळे
२.श्री.गोकुळ आण्णा कडाळे
मु.पो.पिंपरी खुर्द, ता.इंदापूर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे मंडळ,
पुणे सिंचन भवन, पुणे-४११०११ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, निरा उजवा कालवा विभाग,
फलटण, ता.फलटण, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४६० / २०१० / पुणे |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाची तारीख | दि.२७.१२.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे मंडळ,
पुणे सिंचन भवन, पुणे प्रतिनिधी श्री.एल.पी.कुलकर्णी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, निरा उजवा कालवा विभाग,
फलटण, ता.फलटण, जि.सातारा श्री.ता.म.जेंगटे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि२७.१२.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

उपकार्यकारी अभियंता, फलटण यांच्या विभागांतर्गत सर्व उपविभागांनी सन २००५ ते २००९ या काळात केलेल्या सर्व कामांच्या खर्चासह संपूर्ण तपशील व अन्य माहिती मिळण्याची मागणी दि.४.१२.२००९ च्या अर्जान्वये अपीलकर्ता श्री.भिमराव(दादा)कडाळे व श्री.गोकुळ आण्णा कडाळे यानी केली होती. घअपीलकर्ता यानी दारिद्र्यरेषेखाली असल्याचे नमूद केले असून कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती दि.३०.१२.२००९ च्या पत्रान्वये दिली. ऊर्वरित माहिती अन्य विभागांकडून घेऊन रजिस्टर्ड टपालाने पाठविली,ङ असे जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, निरा उजवा कालवा विभाग, फलटण, ता.फलटण, जि.सातारा श्री.ता.म.जेंगटे यानी व अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे सिंचन भवन, पुणे यांचे प्रतिनिधी श्री.एल.पी.कुलकर्णी यानी पूरक कागदपत्रांसह सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले आहे. त्याबाबतचा संपूर्ण तपशील देणारे लेखी निवेदनही त्यानी सादर केले.

श्री.भिमराव(दादा)कडाळे व श्री.गोकुळ आण्णा कडाळे या दोन वेगवेगळ्या व्यक्ती असून पैकी श्री.गोकुळ कडाळे हे दारिद्र्यरेषेखालील अर्जदार आहेत. त्यानी एकत्रितपणे माहिती मागणी केली आहे. त्याबरोबरच प्रथम अपिलाचे सुनावणीसाठीही श्री.भिमराव कडाळे हे उपस्थित राहिले होते. श्री.गोकुळ कडाळे हे अनुपस्थित होते. या सर्व बाबी पाहता श्री.भिमराव(दादा)कडाळे हे दारिद्र्यरेषेखालील अर्जदार नाहीत. तरीही या कार्यालयाने त्याना उपलब्ध माहिती कोणतेही शुल्क न आकारता माहिती मोफत दिलेली आहे,ङअसेही जन माहिती अधिकारी तथा यानी निवेदनात नमूद केले आहे. अशा प्रकारे अर्ज करून, दारिद्र्यरेषेखालील व्यक्तीला नि:शुल्क माहिती देण्याच्या माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील सवलतीचा फायदा घेण्याची कृती योग्य नाही. अत्यंत विस्तृत स्वरूपाची माहिती अपीलकर्त्यांनी मागितली असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ७(९) अन्वये ती नाकारता येऊ शकेल. तथापि तसे न करता माहिती देण्याबाबत जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ७.०१.२०१२**

**¸राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सुधाकर तुकाराम बोराटे
मु.पो.इंदापूर, संत सावतामाळीनगर, रिया आईस्क्रीमशेजारी, ता.इंदापूर, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, माळशिरस,
तहसील कार्यालय माळशिरस, ता.माळशिरस, जि.सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, माळशिरस,
तहसील कार्यालय माळशिरस, ता.माळशिरस, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४९७ / २०१० / पुणे |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाची तारीख | दि.२७.१२.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री.सुधाकर तुकाराम बोराटे<br>मु.पो.इंदापूर, संत सावतामाळीनगर, रिया आईस्क्रीमशेजारी, ता.इंदापूर, जि.पुणे<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, माळशिरस, तहसील कार्यालय माळशिरस, ता.माळशिरस, जि.सोलापूर तत्कालीन श्री.वैभव वि.नावडकर | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने दि.२७.१२.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

घ्शहा धारशी जीवन आणि कंपनी (भारत गॅस), अकलूजङ यांच्याकडून घेतलेले गॅस कनेक्शन व इतर माहिती अपीलकर्ता श्री.सुधाकर तुकाराम बोराटे यानी मागितली हेती. जन माहिती अधिकारी यानी खोटी

माहिती दिली व अपिलीय प्राधिकारी यानी त्याबाबत योग्य कारवाई केली नाही, म्हणून दोघांनाही शास्ती लावावी, अशी मागणी अपीलकर्ता यानी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात केली आहे.

अपीलकर्त्यानी मागितलेली माहिती गॅस कंपनीकडील असून कार्यालयाच्या अभिलेखातील नाही. कार्यालयाच्या अभिलेखातील माहिती देण्यात आली आहे, असे तपशीलवार लेखी निवेदन तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, माळशिरस, तहसील कार्यालय माळशिरस, ता.माळशिरस, जि.सोलापूर श्री.वैभव वि.नावडकर यानी पूरक कागदपत्रांसह सादर केले.

हीच माहिती अपीलकर्ता यानी यापूर्वीही मागितली होती व ती त्याना विनामूल्य देण्यात आली होती. प्रस्तुत अर्जाबाबत त्यानी प्रथम अपील केलेले नाही, असे लेखी निवेदन विद्यमान अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, माळशिरस, तहसील कार्यालय माळशिरस, ता.माळशिरस, जि.सोलापूर श्री.वैभव वि.नावडकर यानी दि.२७.१२.२०११ रोजी सादर केले.

प्रपत्रातील नोंदी व उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी माहितीबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे. माहिती छापील स्वरूपातङ मिळण्याची अपीलकर्त्याची मागणी योग्य नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ७.०१.२०१२**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

१.श्री.भिमराव(दादा)कडाळे
२.श्री.गोकुळ आण्णा कडाळे
मु.पो.पिंपरी खुर्द, ता.इंदापूर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,
पोवई नाका, जि.सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,
पोवई नाका, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४६१ / २०१० / पुणे |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाची तारीख | दि.२७.१२.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,
पोवई नाका, जि.सातारा श्री.राजेश पांडुरंग निघोट

**जन माहिती अधिकारी** तथा उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,
पोवई नाका, जि.सातारा श्री.दिलीप विनायक जाधव

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२७.१२.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

अपीलकर्ता श्री.भिमराव(दादा)कडाळे व श्री.गोकुळ आण्णा कडाळे यानी अत्यंत विस्तृत स्वरूपाची माहिती मागितली होती. अपीलकर्त्यातील एका व्यक्तीने दारिद्र्यरेषेखाली असल्याचे नमूद केले असून घ्कार्यालयात उपस्थित राहून माहिती पाहणेबाबतङ त्याना कळविले. त्यानुसार अर्जदार हे दि.१७.८.२००९ रोजी कार्यालयात समक्ष हजर राहिले. त्यानी माहिती पाहून घ्शंका निरसन झाले असून, अर्ज दप्तरी दाखल करण्याबाबत विनंती केली,ङअसे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले आहे. माहिती-मागणी अर्जावर केलेल्या कार्यवाहीचा संपूर्ण तपशील देणारे निवेदन, अपीलकर्त्याच्या शंका निरसन झाल्याच्या पत्राच्या प्रतीसह त्यानी सादर केले. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी केलेली कार्यवाही योग्य आहे. ते लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ७.०१.२०१२**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.प्रकाश विनायक पवार
२५१/ क, शनिवार पेठ, पुणे-३० अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त(भूसंपादन व व्यवस्थापन),
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपअभियंता, भूमी आणि जिंदगी,
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४४२ / २०१० / पुणे |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाची तारीख | दि.२७.१२.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.प्रकाश विनायक पवार
२५१/ क, शनिवार पेठ, पुणे-३०

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त(भूसंपादन व व्यवस्थापन),
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे श्री.रामचंद्र शिंदे

**जन माहिती अधिकारी** तथा उपअभियंता, भूमी आणि जिंदगी,
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे श्री.खंडू निम्हण

४ माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे.

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२७.१२.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

मराठा भांडीवाले सहकारी गृहरचना संस्थेबाबत अपीलकर्ता वेळोवेळी माहितीच्या अधिकारात अर्ज करीत असून त्याना माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. प्रस्तुत प्रकरणातील माहिती मुदतीत न दिल्याबद्दल संबंधित सेवकाला समज देण्यात आलेली आहे. तसेच अपीलकर्त्याच्या याच विषयाच्या अन्य अर्जांबाबत अभिलेखाचे अवलोकनही करू देण्यात आले आहे, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले. उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता ते रास्त असल्याचे दिसून येते. मात्र अपीलकर्ता पुनः पुन्हा त्याच विषयाबाबत माहिती मागत असले तरी त्या त्या वेळी संबंधित अर्जाला विहित मुदतीत उत्तर दिले गेले पाहिजे, याची समज तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, भूमी आणि जिंदगी, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे श्री.साहेबराव दांडगे व अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त (भूसंपादन व व्यवस्थापन), पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे श्री.सुधाकर तेलंग यांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ७.०१.२०१२**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

सौ.बायडाबाई सुभाष पारखी
स.नं.८८/४, प्लॉट नं. १३,
गुजरात कॉलनी, कोथरुड, पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनी, कोथरुड उपविभाग,पुणे ४११ ०३८
उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपकार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनी, कोथरुड उपविभाग,पुणे ४११ ०३८

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२५९/२०१०/पुणे |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाची तारीख | दि. २७/१२/२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनी, कोथरुड उपविभाग,
पुणे यांचे वतीने श्री. सुरेश लक्ष्मण धुमाळ

**जन माहिती अधिकारी** तथा उपकार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनी, कोथरुड उपविभाग,
पुणे श्री. रामदास गोविंदराव कुलकर्णी

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. २७/१२/२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

आपल्या मीटरवरुन चोरुन कनेक्शन घेऊन वीज वापर केला जात असल्याची तक्रार अपीलकर्त्या यानी केली होती व त्याबाबतच्या कार्यवाहीची माहिती दि. २/२/२०१० च्या अर्जान्वये मागितली होती. दि.२७/२/२०१० च्या पत्रान्वये त्याना मुद्देनिहाय उत्तर दिले. प्रथम अपिलातील निर्णयानुसार त्याना हव्या असलेल्या अन्य कागदपत्रांच्या प्रतीही पुरविल्या. याच विषयासंदर्भातील अपीलकर्त्यांचे अ.क्र. १२५८/२०१०/पुणे आयोगाने दि. २९/९/२०१० च्या आदेशान्वये निकाली काढले आहे, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात पूरक कागदपत्रांसह नमूद केले आहे

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी यानी माहितीबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ९.०१.२०१२**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.दत्ताजीराव विष्णुपंत देसाई
मडिलगे बु.ता.भुदरगड, जि.कोल्हापूर ४१६२०९ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर निबंधक, सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागरी बँका २,
मुख्यालय, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२५८ / २०१० / कोल्हापूर |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाची तारीख | दि.१५.१२.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागरी बँका २,<br>मुख्यालय, जि.पुणे प्रतिनिधी श्री.टी.एन.करे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने दि.१५.१२.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

अपीलकर्त्याचा अर्ज दि.१३.१.२०१० रोजी प्राप्त झाला. दि.११.२.२०१० च्या पत्रान्वये शुल्क कळविले. ते त्यानी भरले नसल्यामुळे माहिती दिली नाही, असे जन माहिती अधिकारी यानी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले आहे.

विशिष्ट स्वरूपाचा आदेश का दिला, तसेच अधिकाऱ्यांची कार्यकर्तव्ये व त्याबाबतीतील उतारे, अशा स्वरूपाची माहिती अपीलकर्त्यानी मागितली असल्याचे कागदपत्रावरून दिसून येते. खुलासा, स्पष्टीकरण अशी विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही व अधिकाऱ्यांची कर्तव्ये आदि माहिती सार्वजनिकरीत्या उपलब्ध असलेल्या नियमावलीतील असून जन माहिती अधिकाऱ्यांच्याच कक्षेतील मानता येणार नाही, त्यामुळे ती देणे जन माहिती अधिकारी यांच्यावर बंधनकारक नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**पुणे**
**राज्य माहिती आयुक्त,**

**दि. १७.१.२०१२**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.जावेद रमजान शेख
हसनपापा हाऊस, विठ्ठलवाडी, आकुर्डी, पुणे-४११०३५ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शहर अभियंता, पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, स्थापत्य विभाग,
अ प्रभाग कार्यालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२३४ / २०१० / पुणे |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाची तारीख | दि.२७.१२.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शहर अभियंता, पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी, पुणे श्री.एन.एस.ऊमाटे

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, स्थापत्य विभाग, अ प्रभाग कार्यालय,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे श्री.एस.एन.इंगळे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने दि.२७.१२.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

घ्मला हवी असलेली माहिती प्राप्त झालेने माझे संदर्भीय अपील निकालात काढणेविषयी आपणांस विनंती आहे,ङअसे लेखी निवेदन अपीलकर्ता श्री.जावेद रमजान शेख यानी दि.१३.१२.२०११ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केले. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात ते नमूद केले आहे.

अपीलकर्त्याची विनंती मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ९.०१.२०१२**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सिध्दार्थ भगवान बनसोडे
मु.पो.पिंपळी, ता.बारामती, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी, बारामती उपविभाग,
बारामती, ता.बारामती, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा शिरस्तेदार, उपविभागीय अधिकारी, बारामती उपविभाग,
बारामती, ता.बारामती, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०१३ / २०१० / पुणे |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाची तारीख | दि.२७.१२.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री.सिध्दार्थ भगवान बनसोडे<br>मु.पो.पिंपळी, ता.बारामती, जि.पुणे<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा शिरस्तेदार, उपविभागीय अधिकारी, बारामती उपविभाग,<br>बारामती, ता.बारामती, जि.पुणे श्री.जी.एस.भालेराव | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२७.१२.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

घ्माहिती मिळाल्याने अपील निकाली काढावे. त्यास अपीलकर्ता म्हणून माझी संमती आहे,ङअसे अपीलकर्ता श्री.सिध्दार्थ भगवान बनसोडे यानी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले आहे. तसेच घ्मौजे पिंपळी जमीन गट नं.५० गायरान जमिनीमधील (१)श्री.ज्ञानदेव बाबर यांचे विहिरीचे वापराचे मुदतवाढ मिळाली आहे. त्यानी शर्तभंग केलेने सदरची विहिर शासनाने ताब्यात घ्यावी, (२)याच गटातील श्री.निंबाळकर याना विहिरीचे वापराबाबत त्यानी नियमाप्रमाणे महसूल सरकारी खजिन्यात भरण्याकामी कार्यवाही करावी व विहिरीचे जागेचा वापर दिलेल्या क्षेत्रापेक्षा जास्त असल्याने कार्यवाही करावीङअशा मागण्या त्यानी केल्या असून जन माहिती अधिकारी यानी घ्अर्जदार यांच्या मागणीप्रमाणे चौकशी करून पुढील प्रशासकीय कार्यवाही करण्याची दक्षता घेत आहोत,ङअसे सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले आहे.

जन माहिती अधिकाऱ्यानी अपीलकर्त्यास विहित मुदतीत उत्तर दिले असून अपीलकर्त्यानी प्रपत्रात नमूद केलेल्या मागण्या प्रशासकीय कार्यवाहीच्या आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अंतर्गत त्या येत नाहीत. त्यामुळे त्याबाबतच्या कार्यवाहीचा उभय बाजूंमधील चर्चेने झालेला निर्णय मूळ प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने उल्लेखनीय असला तरी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५च्या कक्षेत त्याचा समावेश होत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १७.०१.२०१२**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. महमद एकबाल एस. शेख,
बी- १६, कुमार प्रिमिअर्स हौसिंग सोसायटी,
७४५, भवानी पेठ, पुणे ४११ ००२ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपनिबंधक,
सहकारी संस्था, पुणे शहर (२), साखर संकुल,
शिवाजीनगर, पुणे ४११ ००५

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य लिपिक,
सहकारी संस्था, पुणे शहर (२), साखर संकुल,
शिवाजीनगर, पुणे ४११ ००५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४९४/२०१०/पुणे |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाची तारीख | दि.२८/१२/२०११ |

**३. उपस्थित**

**विद्यमान अपिलीय प्राधिकारी** तथा उपनिबंधक,
सहकारी संस्था, पुणे शहर (२), साखर संकुल,
शिवाजीनगर, पुणे श्री. आर. बी. कुलकर्णी

**तत्कालीन अपिलीय प्राधिकारी** तथा उपनिबंधक,
सहकारी संस्था, पुणे शहर (२), साखर संकुल,
शिवाजीनगर, पुणे श्री. एस. एस. चपटे

| | |
|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** तथा मुख्य लिपिक,<br>सहकारी संस्था, पुणे शहर (२), साखर संकुल,<br>शिवाजीनगर, पुणे श्री. पी. जी. निमाजकर |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. २८/१२/२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

अपीलकर्ता यानी कुमार प्रिमियर सहकारी गृहरचना संस्था मर्या.,७४५, भवानी पेठ, पुणे-४२ या संस्थेच्या अनुषंगाने सातत्याने अर्ज, पत्रव्यवहार व अपिले करतात. वेळोवेळी त्याना माहिती देण्यात आली आहे. त्यांच्या मागणीनुसार प्रशासकीय कारवाई करुन माहिती दिलेली आहे, अशी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नोंद केली.

अपीलकर्ता एकाच संस्थेबाबत तक्रारीच्या स्वरुपातील अर्ज व अपिले माहितीच्या अधिकारात करीत असून आयोगाने यापूर्वी त्यांचे अपील क्र. ७७०/२०१०/पुणे प्रकरणी दि. २९/१२/२०११ रोजी आदेश दिलेले आहेत. पुनः पुन्हा अशा प्रकारे एकाच विषयासाठी व माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत न येणारी मागणी ते करतात. अशा प्रकारे सर्व यंत्रणांचा वेळ व परिश्रम यांचा अपव्यय न करण्याची समज अपीलकर्ता याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ९.०१.२०१२**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. वसंत माधव देशपांडे
१६, विद्यालक्ष्मी हॅपी कॉलनी रस्ता क्र. १,
कोथरुड , पुणे ४११ ०३८ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी , नगरवाला हायस्कूलजवळ,
शास्त्रीनगर, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपकार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी , नगरवाला हायस्कूलजवळ,
शास्त्रीनगर, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६३७/२०१०/पुणे |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाची तारीख | दि. २८/१२/२०११ |

**३. उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा उपकार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी , नगरवाला हायस्कूलजवळ,
शास्त्रीनगर, पुणे श्री. गणेश केशवराव अलोने

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. २८/१२/२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

'इमारतीत गृहनिर्माण संस्था नसताना अध्यक्षांच्या नावे दिलेल्या वीज मिटर संदर्भातील माहिती' अपीलकर्ता श्री. वसंत माधव देशपांडे यानी मागितली होती. ती त्याना विहित मुदतीत देण्यात आली. त्याच संदर्भात त्यानी दि. ५/१/२०११ रोजी पुन्हा अर्ज दाखल केला. त्याबाबतचा खुलासा दि. ३/२/२०११ च्या पत्रान्वये देण्यात आला, असे लेखी निवेदन जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पूरक कागदपत्रांसह सादर केले. त्याचा सारांश त्यानी प्रपत्रात नमूद केला आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्याला माहिती देण्यात आली आहे.

अपील निकाली काढण्याबाबत अपीलकर्ता यानी नमूद केले असून जन माहिती अधिकारी यानी सहमतीदर्शक स्वाक्षरी केली आहे

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ९.०१.२०१२**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.प्रकाश दत्तात्रय मांगले
दत्तप्रभा, ४२ विवेक सोसायटी, पद्मावती, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त, विभागीय कार्यालय क्र.३,
पुणे महानगरपालिका, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा क्षेत्रिय अधिकरी, सहकारनगर क्षेत्रिय कार्यालय,
पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६७० / २०१० / पुणे |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाची तारीख | दि.२७.१२.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.प्रकाश दत्तात्रय मांगले
दत्तप्रभा, ४२ विवेक सोसायटी, पद्मावती, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त, विभागीय कार्यालय क्र.३,
पुणे महानगरपालिका, पुणे श्री.सुरेश नरसिंह जगताप

**जन माहिती अधिकारी** तथा क्षेत्रिय अधिकरी, सहकारनगर क्षेत्रिय कार्यालय,
पुणे महानगरपालिका, पुणे श्रीमती संध्या दुला गागरे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२.१२.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

छश्री.मांगले यानी दि.१५.३.२०१० रोजी माहिती मागविली असता दि.३०.३.२०१० रोजी माहिती दिली. श्री.मांगले यानी दि.७.५.२०१० रोजी अपिलीय प्राधिकारी यांच्याकडे अपील केले. दि.७.५.२०१० रोजी सुनावणी होऊन दि.३.१.५.२०१० रोजी अपीलकर्ता माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. १५ दिवसांत जागापाहणी करून अपिलार्थीचे समाधान होईपर्यंत तक्रारीचे निरसन करावे, असे आदेश दिले व स्वच्छतागृहाचे कुलूप काढून टाकण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी यांनी दिले. अपिलीय प्राधिकारी यांच्या आदेशाप्रमाणे कारवाई केलेली आहे,ङअसे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले आहे. घ्माझ्या तक्रारीचे पूर्ण उच्चाटन होईपर्यंत संबंधित अधिकाऱ्याना दंडात्मक व शास्तीची कारवाई व्हावी,ङअसे अपीलकर्ता यानी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले आहे.

उभय बाजूंच्या प्रपत्रातील नोंदी व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यानी विविध स्वरूपाच्या तक्रारी केल्या आहेत. त्याबाबत अपिलीय प्राधिकारी यानी प्रथम अपिलाच्या निर्णयात प्रशासकीय कार्यवाहीचे आदेश दिल्याचे दिसून येते. मात्र अपीलकर्त्याची मागणी असे आदेश माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेत येत नाहीत. त्यामुळे अधिकाऱ्यांवर दंडात्मक कारवाईची अपीलकर्त्याची मागणी माहितीच्या अधिकारात रास्त ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १७.०१.२०१२**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.संजय खंडू खरात
स.नं.३१/१, मिलिंद निवास, चौधरीनगर, धानोरी, पुणे-१५ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, पुणे,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे-१ ` उत्तरवादी

**(१)जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख,
आंबेगाव(घोडेगाव), ता.आंबेगाव, जि.पुणे (अ.क्र.२०७३/२०१० / पुणे)
**(२)जन माहिती अधिकारी** तथा वरिष्ठ लिपिक, अधीक्षक, भूमी अभिलेख, पुणे,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे-१ (अ.क्र.२०७४/२०१० / पुणे)

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०७३+२०७४ / २०१० / पुणे |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाची तारीख | दि.२७.१२.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.संजय खंडू खरात
स.नं.३१/१, मिलिंद निवास, चौधरीनगर, धानोरी, पुणे-१५

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, पुणे,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे श्री.कि.रा.तवरेज

**(१)जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख,
आंबेगाव(घोडेगाव), ता.आंबेगाव, जि.पुणे श्री.प्र.ता.घाडगे

<table>
<tr><td colspan="2">(२)जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपिक, अधीक्षक, भूमी अभिलेख, पुणे,<br>जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे श्रीमती एस.एस.मेंगाणे</td></tr>
<tr><td>४</td><td>माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे.</td></tr>
</table>

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२७.१२.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

घअधीक्षक, भूमी अभिलेख, पुणे यांच्याकडील अपील क्र.१६५/१९४/१९९५ मध्ये अपील दि.२९.७.१९९८ रोजी बंद करण्यात आले होते. सदर अपील निर्णयासाठी बंद केल्यानंतर रिओपन केलेल्याची नोटीस अपीलदार याना पाठविलेली आहे,ङ त्याची मागणी अपीलकर्ता यानी केली आहे. मात्र मूळ नोटीस उपलब्ध न झाल्याने प्रत देण्यात आली नाही, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी नमूद केले आहे. माहिती उपलब्ध नसण्याचे कारण जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी देत नाहीत. माहिती पुरविली असल्याचे सांगून ते दिशाभूल करीत आहेत, असे अपीलकर्ता यानी म्हटले आहे.

उभय बाजूंच्या प्रपत्रातील नोंदी व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अभिलेखाच्या वर्गवारीनुसार संबंधित नोटिशीचा जतनाचा कालावधी किती आहे, हे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी तपासून पुढील कार्यवाही करणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपिले अंशतः मान्य करण्यात येत आहेत.

(२) अपीलकर्त्यांनी मागणी केलेल्या नोटिशीच्या जतनाचा अभिलेख वर्गवारीनुसार कालावधी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी स्पष्ट करावा. त्यानुसार, संबंधित कागदपत्रे जतन करणे आवश्यक असूनही उपलब्ध नसल्यास जतनाची जबाबदारी असणाऱ्या कर्मचाऱ्यांवर

महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ अन्वये कारवाई करून जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी दि.३०.१.२०१२ पर्यंत आयोगाला अहवाल सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १७.०१.२०१२**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.गुलाब सिताराम जाधव
४७/ ३, भावेश सोसायटी, तावरे कॉलनी, पुणे सातारा रोड,
हॉटेल नवरत्नपाठीमागे,पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, पुणे,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, खेड,
राजगुरूनगर, ता.खेड, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७८० / २०१० / पुणे |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाची तारीख | दि.२७.१२.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, पुणे,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे श्री.किशोर तवरेज

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, खेड,
राजगुरूनगर, ता.खेड, जि.पुणे श्री.प्रमोद तानाजी घाडगे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२७.१२.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

घ्अपीलकर्ता याना मुदतीत माहिती देण्यात आलेली आहे,ङअसे जन माहिती अधिकारी यानी व घ्प्रथम अपील दाखल झालेले नाही,ङअसे अपिलीय प्राधिकारी यानी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले आहे. जन माहिती अधिकारी यानी दिलेले उत्तर योग्य असल्याचे कागदपत्रांवरू न स्पष्ट होते. जन माहिती अधिकाऱ्यांच्या उत्तराविरूध्द तक्रार असल्यास अपीलकर्त्यांनी प्रथम अपील करणे आवश्यक असून ते केलेले नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १७.०१.२०१२**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.कासम हसन कुरेशी
जामेमशिद शेजारी, खाटीक गल्ली, ता.बारामती, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, बारामती,
ता.बारामती, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय,
बारामती, ता.बारामती, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५६४ / २०१० / पुणे |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाची तारीख | दि.२७.१२.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, बारामती,
ता.बारामती, जि.पुणे श्री.हिम्मत खराडे

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय,
बारामती, ता.बारामती, जि.पुणे श्री.पी.बी.भोंग

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने दि.२७.१२.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

घ्मी मागणी केलेली माहिती मला मिळाल्याने माझी काही एक तक्रार राहिलेली नाही. त्यामुळे माझे अपील निकालात काढण्यात यावे. याकामी माझी कोणत्याही अधिकारी यांचेविरूध्द तक्रार राहिली नाही. कोणत्याही प्रकारच्या शास्तीचा आग्रह नाही. तरी माझे अपील निकाली काढण्यात यावे,ङ असे अपीलकर्ता श्री.कासम हसन कुरेशी यानी दि.२८.१२.२०११ रोजी अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, बारामती, ता.बारामती, जि.पुणे यांच्याकडे सादर केलेल्या निवेदनात म्हटले आहे. त्यांची विनंती मान्य करण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सदरचे निवेदन दि.२९.१२.२०११ रोजी आयोगाला सादर केले. ते पाहता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १७.०१.२०१२**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.रवींद्र सदाशिवराव यादव
१५०/३, मोहनवाडी, आळंदीरोड, येरवडा, पुणे-४११००६ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहजिल्हा निबंधक, वर्ग-१, ५-फायनान्स रोड,
बी.जे.मेडीकल लेडीज हॉस्टेलसमोर, पुणे-४११००१ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहदुय्यम निबंधक, हवेली क्र.७,
चंदननगर, पुणे-४११०१५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६६९ / २०१० / पुणे |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाची तारीख | दि.२८.१२.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br>**जन माहिती अधिकारी** तथा सहदुय्यम निबंधक, हवेली क्र.७,<br>चंदननगर, पुणे श्री.आर.एन.चौधरी | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**<u>विवेचन</u>**

राज्य माहिती आयोगाने दि.२८.१२.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

अपीलकर्त्याच्या मिळकतीवरील बनावट कागदपत्रांच्या आधारे दस्त नोंदणी झाल्याची व संबंधित दस्त रद्द करण्याच्या कार्यवाहीबाबतची माहिती अपीलकर्ता श्री.रवींद्र सदाशिवराव यादव यानी मागितली होती.

कोणतीही माहिती मिळालेली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता यानी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली आहे.

घअपीलकर्ता यांचा मूळ अर्ज दि.१६.६.२०१० रोजी प्राप्त झाला. त्यानंतर दि.३०.६.२०१०च्या पत्रान्वये माहिती अपीलकर्त्यास समक्ष दि.२२.७.२०१० रोजी कार्यालयातच देण्यात आली. तदनंतर प्रथम अपील दि.२१.८.२०१० रोजी अपिलीय प्राधिकारी यांच्याकडे केले. त्यात अपील निकाली काढण्यात आले आहे. दस्ताच्या प्रती देण्याविषयी अर्जदार यानी नोंदणी कायद्यानुसार शुल्क भरल्यास हे कार्यालय दस्ताची प्रत देण्यास तयार आहे,ङ असे जन माहिती अधिकारी यानी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकाऱ्यानी अपीलकर्त्यास विहित मुदतीत मुद्देनिहाय उत्तर दिले आहे. तसेच दस्ताच्या प्रती अपीलकर्त्यास हव्या असल्यास योग्य ते शुल्क भरण्याबाबत स्पष्ट केले आहे. अपीलकर्त्यास दस्ताच्या प्रती हव्या असल्यास त्यानुसार शुल्क भरून प्राप्त करून घेता येतील.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ९.०१.२०१२**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री एम. डी. शिंदे
पोलिस उपअधीक्षक, पोलिस प्रशिक्षण केंद्र, खंडाळा अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्राचार्य,
पोलिस प्रशिक्षण विद्यालय, खंडाळा, जि. पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप प्राचार्य,
पोलिस प्रशिक्षण विद्यालय, खंडाळा, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२४३/२०१०/पुणे |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाची तारीख | दि. २७/१२/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** -श्री एम. डी. शिंदे
पोलिस उपअधीक्षक, पोलिस प्रशिक्षण केंद्र, खंडाळा

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्राचार्य,
पोलिस प्रशिक्षण विद्यालय, खंडाळा, जि. पुणे श्री. शिवाजीराव बी. शिंदे

**जन माहिती अधिकारी** तथा उप प्राचार्य,
पोलिस प्रशिक्षण विद्यालय, खंडाळा, जि. पुणे श्री. निलेश अष्टेकर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## <u>विवेचन</u>

राज्य माहिती आयोगाने दि. २७/१२/२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

अपीलकर्ता यानी पोलिस प्रशिक्षण विद्यालय, खंडाळा या केंद्राच्या आस्थावनेवरील कामकाजाचे व स्वतःच्या रजेच्या अनुषंगाने ३३ मुद्दयांची माहिती मागितली होती. अत्यंत विस्तृत स्वरुपाच्या माहितीची मागणी व 'हे खरे आहे काय', कारणे, अभिप्राय, स्पष्टीकरण अशा स्वरुपाची विचारणा या मुद्दयांमध्ये केली होती. त्यावेळी देय असणारी माहिती त्वरित दिली व अन्य माहिती संकलित होईल तसतशी टप्प्याटप्प्याने दिली. सर्व मुद्दयांचे उत्तर दिले, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात पूरक कागदपत्रांसह नमूद केले. अपूर्ण व जाणीवपूर्वक खोटी माहिती देऊन त्रास दिला. प्रमाणपत्राच्या प्रती दिल्या नाहीत. त्यामुळे कारवाई व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता यानी नोंदवली.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यांनी खुलासा, कारणे, स्पष्टीकरण अशा स्वरुपाची विचारणा बहुसंख्य मुद्दयांमध्ये केली असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत ती येत नाही. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ९.०१.२०१२**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.मधु दुनिचंद सबनानी
११२ /१/१, राधाकृष्ण कॉलनी, हीना पॅलेससमोर,
नढेनगर, काळेवाडी, पुणे-४११०१७ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त (जकात), पिंपरी चिंचवड
महानगरपालिका, पिंपरी, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य आयातकर अधीक्षक, पिंपरी चिंचवड
महानगरपालिका, पिंपरी, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९७०+१९७५ / २०१० / पुणे |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाची तारीख | दि.२७.१२.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.मधु दुनिचंद सबनानी
११२ /१/१, राधाकृष्ण कॉलनी, हीना पॅलेससमोर, नढेनगर, काळेवाडी, पुणे-४११०१७

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त (जकात), पिंपरी चिंचवड
महानगरपालिका, पिंपरी, पुणे श्री.अशोक मुंढे

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य आयातकर अधीक्षक, पिंपरी चिंचवड
महानगरपालिका, पिंपरी, पुणे श्री.नारायण कांबळे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## <u>विवेचन</u>

राज्य माहिती आयोगाने दि.२७.१२.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

घ्माहिती अधिकारी यानी माहिती दिलेली आहे. अपील विहित मुदतीत निकाली काढले आहे,ङअसे जन माहिती अधिकारी तथा मुख्य आयातकर अधीक्षक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे श्री.नारायण कांबळे व अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (जकात), पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे श्री.अशोक मुंढे यांनी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले आहे. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी चर्चेला तयार नसल्यामुळे व अपूर्ण माहिती मिळाली असल्यामुळे जन माहिती अधिकाऱ्यांवर शास्ती लावावी, अशी मागणी अपीलकर्ता यानी नोंदविली.

प्रपत्रातील नोंदी व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यानी कायदाविषयक तरतुदींच्या अनुषंगाने विशिष्ट स्वरूपाचे प्रश्न विचारले आहेत. जन माहिती अधिकाऱ्यानी त्यांच्या दि.१२.३.२०१० च्या अर्जाला दि.५.४.२०१० पत्रान्वये विहित मुदतीत दिलेले उत्तर योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

अपिले अमान्य करण्यात येत आहेत.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १७.०१.२०१२**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. पांडुरंग दत्तात्रय थिटे,
मु. पो. केंदुर, ता. शिरूर, जि. पुणे ४१२ ४०३ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती शिरूर, ता. शिरूर, जि. पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा विस्तार अधिकारी (उद्योग),
पंचायत समिती शिरूर, ता. शिरूर, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५०७/२०१०/पुणे |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाची तारीख | दि. २७/१२/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. पांडुरंग दत्तात्रय थिटे,
मु. पो. केंदुर, ता. शिरूर, जि. पुणे ४१२ ४०३

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती शिरूर, ता. शिरूर, जि. पुणे श्री. विश्वास शिवराम सिद

**जन माहिती अधिकारी** तथा विस्तार अधिकारी (उद्योग),
पंचायत समिती शिरूर, ता. शिरूर, जि. पुणे श्री. एच. एन. आंधळे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२७/१२/२०११ रोजी आयोजित केलेल्या ‘विशेष अपील निर्गत कार्यक्रमा’त या अपिलाचा समावेश होता.

केंदूर या गावामधील दारिद्रय रेषेखालील कुटुंबांबाबतची माहिती अपीलकर्ता यानी मागितली होती. माहिती विहित मुदतीत दिली. परंतु त्यांचे समाधान झाले नाही, असे जन माहिती अधिकारी यानी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले. मात्र अपील मान्य करुन शास्तीची कारवाई व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता यानी प्रपत्रात केली आहे.

‘दारिद्रय रेषेखालील मुद्दयांप्रमाणे आवश्यक माहिती १० दिवसांत देणेत येईल’, असे जन माहिती अधिकारी यानी प्रपत्रात नमूद केले असून ते सर्वांना मान्य असल्याचे अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात म्हटले आहे.

माहिती मुदतीत दिली असल्याचे जन माहिती अधिकाऱ्यांचे प्रतिपादन रास्त नाही. दि. ५/११/२००९ च्या अर्जान्वये अपीलकर्ता यानी मागितलेली माहिती देण्यास जन माहिती अधिकारी श्री.एच.एन.आंधळे यानी कसूर केल्याचा निष्कर्ष अपिलीय प्राधिकारी यानी दि. ८/१/२०१० च्या आदेशामध्ये नोंदविला आहे. विहित मुदतीत माहिती न दिल्याबाबत त्याना कडक शब्दात तंबी देण्यात येत असल्याचे अपिलीय प्राधिकारी यानी या आदेशात स्पष्टपणे म्हटले आहे. ते लक्षात घेता माहिती देण्यासाठी झालेल्या विलंबाचा खुलासा व शास्तीबाबत त्यांचे म्हणणे जन माहिती अधिकाऱ्यांनी स्पष्ट करणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. अपीलकर्त्यास माहिती देण्याबाबत झालेल्या विलंबाचा खुलासा व शास्तीबाबतचे म्हणणे यासह लेखी निवेदन जन माहिती अधिकारी यानी दि. ३०/१/२०१२ पर्यंत आयोगाला सादर करावे. त्यानंतर शास्तीबाबतचा निर्णय घेण्यात येईल.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १७.०१.२०१२**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.राजकुमार प्रल्हाद सूर्यवंशी
मु.पो.जेजुरी, ता.पुरंदर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख,
सिंधुदुर्ग कार्यालय, जि.सिंधुदुर्ग — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा वरीष्ठ लिपीक, अधीक्षक, भूमी अभिलेख,
सिंधुदुर्ग कार्यालय, जि.सिंधुदुर्ग

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२२७ / २०१० / पुणे |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाची तारीख | दि.२७.१२.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.राजकुमार प्रल्हाद सूर्यवंशी
मु.पो.जेजुरी, ता.पुरंदर, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख,
सिंधुदुर्ग कार्यालय, जि.सिंधुदुर्ग श्री.आ.बा.गिरमकर

**जन माहिती अधिकारी** तथा वरीष्ठ लिपीक, अधीक्षक, भूमी अभिलेख,
सिंधुदुर्ग कार्यालय, जि.सिंधुदुर्ग श्री.श्री.ज.जाधव

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने दि.२७.१२.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

जमीन प्रकरणातील अपील का फेटाळले, अशी विचारणा अपीलकर्ता श्री.राजकुमार प्रल्हाद सूर्यवंशी यानी केली होती. त्यांचा दि.१९.१.२०१० चा अर्ज जिल्हाधिकारी, पुणे यानी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे वर्ग करून तसे अपीलकर्त्यास कळविले. दि.४.२.२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्त्यास उत्तर दिले. त्यानी अपील फेटाळण्याची कारणे मागितली आहेत. कोणत्याही कागदपत्रांची मागणी केलेली नाही, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले आहे. संबंधित अधिकाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता यानी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केली आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यानी केलेली विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २ मधील घ्माहितीङच्या व्याख्येत येत नाही. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्याची त्यांची मागणी रास्त ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १७.०१.२०१२**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.जावेद रमजान शेख
हसनपापा हाऊस, विठ्ठलवाडी, आकुर्डी, पुणे-४११०३५ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपसंचालक, नगररचना विभाग,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपअभियंता, नगररचना विभाग,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२३० / २०१० / पुणे |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाची तारीख | दि.२७.१२.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपसंचालक, नगररचना विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे श्रीमती प्रतिभा भदाणे

**जन माहिती अधिकारी** तथा उपअभियंता, नगररचना विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे श्री.शिवाजी राजाराम चौरे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२७.१२.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

घ्अपीलकर्ता यानी केलेला मूळ अर्ज गृहमंत्री, भारत सरकार यांना केलेला असून सदरचा अर्ज नगररचना विभागाकडे दि.२७.११.२००९ रोजी प्राप्त झाला. अपिलार्थी याना दि.२२.१२.२००९ रोजी उत्तर देण्यात आले आहे. घ्माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. या माहितीशिवाय काही माहिती आवश्यक असल्यास त्या त्या विभागातील उपलब्ध अभिलेखाचे अवलोकन करून त्यामधील आवश्यक माहिती मागणी केल्यास उपलब्ध करून देण्यात येईल,ङ असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले आहे. ते मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

# आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १७.०१.२०१२**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. सुनिलकुमार बावधनकर
शॉप नं. ७, प्लॉट नं. ५८, इ.सी.ई.को-ऑप हौसिंग सोसायटी लि.
सेक्टर-११, खारघर, नवी मुंबई ४१० २१० अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपसंचालक,
नगररचना पुणे विभाग, स.क्र.७४/२, सहकारनगर, सारंग सोसायटी,
बँक ऑफ महाराष्ट्राचे वर, पहिल्या मजल्यावर, पुणे - ९
उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगररचनाकार,
नगररचना विभाग बारामती, ता. बारामती, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२३८/२०१०/पुणे |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाची तारीख | दि. २७/१२/२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br>**जन माहिती अधिकारी** तथा नगररचनाकार,<br>नगररचना विभाग बारामती, ता. बारामती, जि. पुणे श्री. दत्तात्रय दा. काळे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. २७/१२/२०११ रोजी आयोजित केलेल्या ‘विशेष अपील निर्गत कार्यक्रमा’त या अपिलाचा समावेश होता.

अपीलकर्ता यानी सन १९९० ते २०१० या काळातील विविध संदर्भातील विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली होती. अभिलेख अवलोकन करुन आवश्यक कागदपत्रांच्या प्रती योग्य ते शुल्क भरुन प्राप्त करुन घेण्याबाबत अपीलकर्त्यास विहित मुदतीत कळविले. परंतु अभिलेख अवलोकन न करता त्यानी अपील केले. त्यावेळी त्यानी केलेल्या मागणीनुसार 'सर्व प्रकरणांची यादी तयार करुन अशी यादी, तसेच मौ. तांदुळवाडी ग.नं. १२३ व मौ. बारामती स.नं. २१३/२ येथील बिनशेती प्रकरणे ज्या नियमाआधारे/नकाशाआधारे नाकारली त्याबाबतची प्रचलित विकास नियंत्रण नियमावलीची छायाप्रत, भाग नकाशा प्रकरणातील छाननी तक्त्यासह अर्जदारास विनामूल्य पुरविणेबाबत सूचना केली असता या कार्यालयाने दि. २९/६/२०१० चे पत्र क्र. ८९८ अन्वये उक्त माहिती अर्जदार याना पुरविली आहे', असे तपशीलवार लेखी निवेदन जन माहिती अधिकारी यानी पूरक कागदपत्रांसह सादर केले. त्याचा सारांश त्यानी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केला. जन माहिती अधिकारी यानी माहितीबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे. अपीलकर्त्यांनी वीस वर्षांच्या काळातील व विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५, कलम ७ (९) अन्वये ती नाकारता येऊ शकते. तसेच  संकलित स्वरुपात माहिती तयार करुन देणे जन माहिती अधिकाऱ्यांवर बंधनकारक नाही. तरीही अपिलीय प्राधिकारी यानी माहिती देण्याबाबत दिलेल्या आदेशाचे पालन जन माहिती अधिकारी केले आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १७.०१.२०१२**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.जावेद रमजान शेख
हसनपापा हाऊस, विठ्ठलवाडी, आकुर्डी, पुणे-४११०३५ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शहर अभियंता, पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी, पुणे ४११०१८ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशहर अभियंता, बांधकाम परवानगी विभाग,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२४४ / २०१० / पुणे |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाची तारीख | दि.२७.१२.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शहर अभियंता, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे श्री.एन.एस.ऊमाटे

**जन माहिती अधिकारी** तथा उपशहर अभियंता, बांधकाम परवानगी विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे श्री.व्ही.बी.काची

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

<u>**विवेचन**</u>

राज्य माहिती आयोगाने दि.२७.१२.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

घ्अपीलकर्ता यानी केलेला मूळ अर्ज गृहमंत्री, भारत सरकार यांना केलेला असून सदरचा अर्ज उपसंचालक, नगररचना व विकास विभागाकडून बांधकाम परवानगी विभागास दि.८.१२.२००९ रोजी प्राप्त झ ााला व त्याचे उत्तर अपीलकर्ता याना दि.७.१.२०१० रोजी देण्यात आले आहे. अपिलीय प्राधिकारी यानी दिलेल्या आदेशाप्रमाणे अपीलकर्ता यांचे प्रतिनिधी यास नस्तीचे अभिलेख पाहिजे ते दाखविण्यास सांगितले असता, सर्व माहिती त्यांच्याकडे उपलब्ध असल्याचे सांगितले. अपीलकर्ता यानी मागणी केलेली माहिती (या अर्जाव्यतिरिक्त) त्याना वेळोवेळी देण्यात आलेली आहे,ङ असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले आहे. ते मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

<u>**आदेश**</u>

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १७.०१.२०१२**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.किशोर वसंतराव कुऱ्हाडे
१९५५, कुऱ्हाडेवाडा, आळंदी देवाची, ता.खेड, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी, आळंदी नगरपरिषद,
आळंदी देवाची, ता.खेड, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा बांधकाम विभाग / तत्कालीन लेखापाल /
पाणीपुरवठा विभाग, आळंदी नगरपरिषद, आळंदी देवाची, ता.खेड, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२४९ / २०१० / पुणे |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाची तारीख | दि.२७.१२.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.किशोर वसंतराव कुऱ्हाडे
१९५५, कुऱ्हाडेवाडा, आळंदी देवाची, ता.खेड, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी, आळंदी नगरपरिषद,
आळंदी देवाची, ता.खेड, जि.पुणे श्री.धनंजय सदाशिव कोळेकर

**जन माहिती अधिकारी** तथा बांधकाम विभाग / तत्कालीन लेखापाल / पाणीपुरवठा विभाग,
आळंदी नगरपरिषद, आळंदी देवाची, ता.खेड, जि.पुणे

| | |
|---|---|
| | श्री.एस.के.गिरमे / श्री.एम.एल.कांबळे / श्री.डी.बी.सोनटक्के |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२७.१२.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

आळंदी शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या बंधाऱ्यातील वाळू उपसा, त्याबाबतच्या निविदा, नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेतील ठराव, पत्रव्यवहार, शहरातील अनधिकृत बांधकामे, त्याविषयीचे न्यायालयीन आदेश आदि माहिती अपीलकर्ता यानी मागितली होती. घ्एक वर्ष आठ महिन्यांचा कालावधी लोटला आहे. तरी मला तपशीलवार माहिती मिळावी व संबंधितांना आर्थिक शास्ती व्हावी, ही विनंती. माहिती तीन दिवसांत मिळावी,ङअसे अपीलकर्ता श्री.किशोर वसंतराव कुऱ्हाडे यानी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले आहे.

घ्बांधकामाबाबत वारंवार माहिती घेऊनही सतत त्याच मुद्दयावर अर्ज करीत आहेत. दिलेली माहिती न स्वीकारता माहिती घेत नाहीत. तरी सदरची माहिती पोस्टाद्वारे पाठविण्यात येईल,ङअसे जन माहिती अधिकारी तथा बांधकाम विभाग / तत्कालीन लेखापाल / पाणीपुरवठा विभाग, आळंदी नगरपरिषद, आळंदी देवाची, ता.खेड, जि.पुणे श्री.एस.के.गिरमे / श्री.एम.एल.कांबळे / श्री.डी.बी.सोनटक्के यानी संयुक्तरीत्या सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले आहे.

उभय बाजूंनी प्रपत्रात केलेल्या नोंदी व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यांनी अनेक विषयांची सरसकट स्वरूपात व विस्तृत माहिती मागितली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ७(९) अन्वये अशी माहिती नाकारता येऊ शकते. परंतु जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी तसे न करता माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे. सरसकट स्वरूपातील माहिती संकलित करून देण्याची तरतूद माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत नाही. अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास अभिलेखाचे अवलोकन करून हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती प्राप्त करून घेता येतील. या स्थितीत जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्यावर कारवाई करण्याची

अपीलकर्त्याची मागणी रास्त ठरत नाही. मात्र 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील एकमताच्या निर्णयानुसार शक्य ती माहिती अपीलकर्त्यास देण्याची कार्यवाही होणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'मधील एकमताच्या निर्णयानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा बांधकाम विभाग / तत्कालीन लेखापाल / पाणीपुरवठा विभाग, आळंदी नगरपरिषद, आळंदी देवाची, ता.खेड, जि.पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, आळंदी नगरपरिषद, आळंदी देवाची, ता.खेड, जि.पुणे यानी दि.३०.१.२०१२ पर्यंत आयोगाला सादर करावा व त्याची प्रत अपीलकर्त्यास पुरवावी.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १७.०१.२०१२**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. हेमंत रमेशचंद्र शहा
रा. १५६, जुना बाजार, खडकी, पुणे ४११ ००३ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलिस उपआयुक्त,
परिमंडळ-४, येरवडा स्मशानभूमीजवळ, सरगम हॉटेल समोर, येरवडा, पुणे
उत्तरवादी
**जन माहिती अधिकारी** तथा सहा. पोलिस आयुक्त,
परिमंडळ-४, येरवडा स्मशानभूमीजवळ, सरगम हॉटेल समोर, येरवडा, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२२१/२०१०/पुणे |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाची तारीख | दि. २७/१२/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. हेमंत रमेशचंद्र शहा
रा. १५६, जुना बाजार, खडकी, पुणे ४११ ००३

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलिस उपआयुक्त,
परिमंडळ-४, येरवडा स्मशानभूमीजवळ, सरगम हॉटेल समोर,
येरवडा, पुणे यांचे वतीने श्री. एम. आर. कुलकर्णी

**जन माहिती अधिकारी** तथा सहा. पोलिस आयुक्त,
परिमंडळ-४, येरवडा स्मशानभूमीजवळ, सरगम हॉटेल समोर,
येरवडा, पुणे श्री. के. एस. सुर्यवंशी

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. २७/१२/२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

पोलिस उपनिरीक्षक श्री. जितेंद्र वसंतराव कोळी यांच्या संदर्भात अपीलकर्ता यानी माहिती मागितली होती. काही माहिती दिली. त्यांचा पत्ता, मूळ गावाकडील पत्ता, जन्मठिकाण,जात ही माहिती त्रयस्थ पक्षाची व्यक्तिगत असून ती देऊ नये असे त्रयस्थ पक्षाने (श्री. कोळी) कळविल्यामुळे ती नाकारली, असे जन व अपिलीय प्राधिकारी यांनी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले.

'दोन्ही अधिकाऱ्यांनी मूळ अर्जातील संपूर्ण माहिती देण्याचे टाळले आहे. कायद्याप्रमाणे ते चुकीचे आहे. त्या माहितीमुळे वैयक्तिक जीवनात काहीही झाले नसते, तरी दुसरे कलम, कारण देऊन त्यानी टाळले आहे', असे अपीलकर्ता यानी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले.

उभय बाजूंनी प्रपत्रात केलेली नोंद व सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता संबंधित पोलिस उपनिरीक्षक यांच्या सेवापुस्तकाच्या पहिल्या पानावर असलेली माहिती व्यक्तिगत व गोपनीय ठरत नाही. तसेच संबंधित कर्मचारी विशिष्ट जात प्रवर्गाअंतर्गत भरती/ बढती याचा लाभ घेत असल्यास, ती बाब शासकीय सेवा अंतर्गत येते. पारदर्शकतेच्या दृष्टीने ती माहिती सार्वजनिकरीत्या उपलब्ध असली पाहिजे. म्हणून कार्यालयीन कागदपत्रात नमूद केलेली जात कोणती आहे याची माहितीही व्यक्तिगत ठरत नाही. त्यामुळे अशा माहितीबाबत माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील - त्रयस्थ पक्ष विषयक व्यक्तिगत माहितीबाबतची तरतूद लागू होत नाही. ही माहिती अपीलकर्त्यास दिली जाणे आवश्यक आहे. मात्र जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये कार्यवाही केली असून त्रयस्थ पक्षांच्या माहितीबाबतच्या तरतुदीचा अन्वयार्थ हा मतभिन्नतेचा विषय झाला आहे. त्यामुळे त्यांच्यावरील कारवाईची मागणी अमान्य करण्यात येत आहे. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. पोलिस उपनिरीक्षक श्री. जितेंद्र वसंतराव कोळी यांच्या सेवापुस्तकाच्या पहिल्या पानाची प्रत व त्यानी शासकीय सेवाविषयक कागदपत्रात नमूद केलेली जात याची माहिती जन माहिती

अधिकारी यानी अपीलकर्त्यास निःशुल्क द्यावी या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल दि. २५/१/२०१२ पर्यंत आयोगास सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १७.०१.२०१२**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. वाशदेव के. इदनानी
२७/३, पी. डब्ल्यु.डी. क्वार्टर,
पिंपरी कॉलनी, पुणे ४११ ०१७ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
पुणे जिल्हा परिषद, पुणे ४११ ००१

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापिका,
जयहिंद हायस्कूल, पिंपरी, पुणे ४११ ०१७

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११९३/२०१०/पुणे |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाची तारीख | दि. २७/१२/२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
पुणे जिल्हा परिषद, पुणे श्रीमती विद्या शिंदे

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापिका,
जयहिंद हायस्कूल, पिंपरी, पुणे श्रीमती ज्योतिका मलकानी

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने दि. २७/१२/२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

अपीलकर्ता यानी दि. १०/३/२०१० च्या अर्जानुसार मागितलेली माहिती देणारे मुद्देनिहाय उत्तर दि. १/४/२०१० च्या पत्रान्वये दिले. रजिस्टर्ड टपालाने विहित मुदतीत माहिती पाठविली, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी यानी अपीलकर्त्यास विहित मुदतीत माहिती दिली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १७.०१.२०१२**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. बाळकृष्ण लक्ष्मण नलावडे
३०१, अबोली बिल्डिंग, स्वराली हौसिंग सोसायटी,
बेडेकर गणपती एम.आय.टी. रोड, कोथरुड, पुणे ४११ ०३८ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त,
विभागीय कार्यालय क्र. १, कर्वेरोड क्षेत्रिय कार्यालय,
पुणे महानगरपालिका, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा क्षेत्रिय अधिकारी,
कर्वेरोड क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११७९/२०१०/पुणे |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाची तारीख | दि. २७/१२/२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त,
विभागीय कार्यालय क्र. १, कर्वेरोड क्षेत्रिय कार्यालय,
पुणे महानगरपालिका, पुणे श्री. विजय दहिभाते

**जन माहिती अधिकारी** तथा क्षेत्रिय अधिकारी,
कर्वेरोड क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. नितीन उदास

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# <u>विवेचन</u>

राज्य माहिती आयोगाने दि. २७/१२/२०११ रोजी आयोजित केलेल्या ‘विशेष अपील निर्गत कार्यक्रमा’त या अपिलाचा समावेश होता.

कोथरुड येथील नियोजित ज्ञानेश्वर बागेतील कामाबाबत हास्यक्लब सदस्यांच्या सोयीसाठी नियमबाहय व्यवस्था केल्याची अपीलकर्त्यांची तक्रार असून त्या अनुषंगाने खुलासा, स्पष्टीकरण, विचारणा, तक्रार व प्रशासकीय कार्यवाहीची मागणी अशा सर्व बाबींचा समावेश असलेल्या अर्ज अपीलकर्ता यानी दि. १५/११/२००९ रोजी केला. यापूर्वीही त्यानी केलेल्या अशा स्वरुपाच्या अर्जावर मुद्देनिहाय उत्तर विहित मुदतीत दिले होते. प्रस्तुत अपिलातील अर्जालाही मुदतीत उत्तर दिले. अपीलकर्त्यांची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून अवास्तव आहे, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नोंदविले आहे. माहितीबाबत त्यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे. अपीलकर्त्यांचे अन्य मुद्दे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १७.०१.२०१२**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. मल्लीक उर्फ काशीविश्वनाथ नामदेव लांडे
रा. रामचंद्र गेणुजी लोंडे (पाटील) बिल्डिंग, कासारवाडी, पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शहर अभियंता,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशहर अभियंता,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६०८/२०१०/पुणे |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाची तारीख | दि. २८/१२/२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शहर अभियंता,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे श्री. एन. एस. उमाटे

**जन माहिती अधिकारी** तथा उपशहर अभियंता,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे श्री. वसंत बा. काची

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## **विवेचन**

राज्य माहिती आयोगाने दि. २८/१२/२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

'अपीलकर्ता यानी मागणी केलेली माहिती त्यांना वेळेत देणेत आलेली आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत तक्रार केलेल्या बांधकामावर कारवाई करणे हा विषय येत नाही', असे जन माहिती अधिकारी यानी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले आहे. संबंधित बांधकामावर कारवाई करण्याच्या संदर्भातील अपीलकर्त्यांची मागणीबाबत अपील क्र. २६०७/२०१०/पुणे आयोगाने दि. २०/६/२०११ च्या आदेशान्वये अमान्य केले असल्याचेही त्यात नमूद केले आहे. त्यांचे निवेदन रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १७.०१.२०१२**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.रमेश दिनकर पुंडे
३, धनदा अपार्टमेंट, भक्ती मार्ग, लॉ कॉलेज रोड, एरंडवणा, पुणे-४ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता(बांधकाम नियंत्रण), घोले रोड क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका, मुद्रणालय आवार, घोले रोड, पुणे-५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपअभियंता(बांधकाम नियंत्रण), घोले रोड क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका, मुद्रणालय आवार, घोले रोड, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७८५ / २०१० / पुणे |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाची तारीख | दि.२७.१२.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता(बांधकाम नियंत्रण), घोले रोड क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका, मुद्रणालय आवार, घोले रोड, पुणे श्री.रा.तु.शेळकंदे

**जन माहिती अधिकारी** तथा उपअभियंता(बांधकाम नियंत्रण), घोले रोड क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका, मुद्रणालय आवार, घोले रोड, पुणे श्री.चंद्रकांत गणेश गायकवाड

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२.१२.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

घ्एरंडवणा येथील स.नं.५०/४०, फायनल प्लॉट नं.७३/३, सबप्लॉट नं.१४ या मिळकतीचे मालकिणीने केलेल्या बेकायदेशीर बांधकामाबाबत सहाय्यक आयुक्त याना दिलेले दि.८.१.२०१० च्या पत्रावर कार्यवाही, हे प्रकरण कार्यालयात कोण हाताळते आहे आणि पत्रावर अद्याप काय कार्यवाही झाली, याची इत्थंभूत माहिती मिळावी, अशी मागणी श्री.पुंडे यांनी केली आहे. राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठापुढे अपील क्र.५४८/२०१० दि.१४.१२.२०११ चे वेळी श्री.पुंडे याना सर्व कागदपत्र व माहिती देण्याबाबत त्यांचेसमवेत झालेल्या समक्ष चर्चेनुसार होऊन बांधकाम नकाशा आज रोजी देण्यात येत आहे,डअसे अपिलीय प्राधिकारी व जन माहिती अधिकारी यांनी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात संयुक्तरीत्या नमूद केले आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) प्रपत्रात नमूद केल्यानुसार माहिती पुरविण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी यानी अपीलकर्त्याच्या पोहोचपत्रासह दि.३०.१.२०१२ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २१.०१.२०१२**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.प्रकाश विनायक पवार
२५१/क, शनिवार पेठ, पुणे-४११०३० अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे कार्यालय,
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे-४११००५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था(२),
अधिन जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७५५ / २०१० / पुणे |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाची तारीख | दि.२७.१२.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.प्रकाश विनायक पवार
२५१/क, शनिवार पेठ, पुणे-४११०३०

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे कार्यालय,
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे प्रतिनिधी श्री.एस.एस.चपटे

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था(२),
अधिन जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे श्री.एस.पी.जाधव

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२७.१२.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

घनियमानुसार दंडात्मक कारवाई करून अपीलकर्त्यास कारवाईचा स्वयंस्पष्ट अहवाल देऊन अपील निकाली काढावे,ङ असे अपीलकर्ता श्री.प्रकाश विनायक पवार यानी म्हटले आहे,ङः घ्या कार्यालयाचे पत्र दि.२८.८.२००९ अन्वये उपनिबंधक, सहकारी संस्था, शहर १ व २ यांच्याकडून स्वयंस्पष्ट अहवालाची मागणी केली होती. त्या अहवालाची मागणी अपीलकर्ता यानी केलेली आहे. सदर उपनिबंधक सहकारी संस्था, शहर १ व २ यांच्याकडून अहवाल प्राप्त झाला नसल्याने अर्जदार याना माहिती देता आली नाही. सदरबाबतचा अहवाल प्राप्त होताच त्याबाबतची माहिती अर्जदार यांना देता येईल,ङअसे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता संदर्भित अहवाल प्राप्त झ ाालेला नसल्यामुळे देण्यात आला नसल्याचे जन माहिती अधिकारी यानी अपीलकर्त्यास कळविले असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या दृष्टीने ते रास्त आहे. अपिलीय प्राधिकारी यानी अहवाल प्राप्त करून घेऊन देण्याचा आदेश दिला आहे. परंतु दि..२८.८.२००९ च्या पत्रान्वये मागविलेला अहवाल अद्याप अप्राप्त असल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी म्हटले आहे. एखाद्या प्रकरणी प्रशासकीय अधिकारातील आदेशानुसार अहवाल दोन वर्षानंतरही प्राप्त होत नाही, हे वस्तुस्थितीचे निवेदन असले, तरी अशाबाबतीत त्याची कारणे स्पष्ट होणे व ती अपीलकर्त्यास कळविली जाणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

(१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

(२) घसंबंधित अहवाल तात्काळ प्राप्त करून देण्यात येईल,ङ असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी प्रपत्रात नमूद केले असून त्याबाबतच्या कार्यवाहीचा अहवाल दि.३०.१.२०१२ पर्यंत आयोगाला सादर करावा. त्याची प्रत अपीलकर्त्यास पुरविण्यात यावी.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २१.०१.२०१२**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सुनील गणपत रकटे
१४१, नाईकचाळ, बोपोडीगांव, पुणे-४११०२० अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहजिल्हा निबंधक वर्ग-१ व मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे(ग्रामीण), फायनान्स रोड, फोटोझिंको कार्यालय इमारत, दुसरा मजला, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा दुय्यम निबंधक, तहसील कार्यालय आवार, ता.शिरूर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७४६ / २०१० / पुणे |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाची तारीख | दि.२७.१२.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सुनील गणपत रकटे
१४१, नाईकचाळ, बोपोडीगांव, पुणे-४११०२०

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहजिल्हा निबंधक वर्ग-१ व मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे(ग्रामीण), फायनान्स रोड, फोटोझिंको कार्यालय इमारत, दुसरा मजला, पुणे श्री.बी.एम.कोळी

**जन माहिती अधिकारी** तथा दुय्यम निबंधक, तहसील कार्यालय आवार, ता.शिरूर, जि.पुणे
श्री.एम.ए.देशमुख

४ माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे.

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने दि.२७.१२.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

घ्अर्जदारानी त्यांचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविला होता. त्यानुसार त्याना दस्त क्र.साठेखत क्र.७०४/८६ व ७०५/८६ नेण्याबाबत पत्रान्वये कळविण्यात आले होते. त्यानंतर अर्जदारांनी अपिलीय प्राधिकारी यांच्याकडे अपील न करता जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपील केले. त्यानुसार त्याना माहिती देण्यात आली,ङअसे अपिलीय प्राधिकारी व जन माहिती अधिकारी यांनी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले आहे.

घ्दस्त क्र. ७०४/८६ व ७०५/८६ मिळाले. तसेच ७०६/८६ चे दस्त साक्षांकित करून मिळेल असे सांगितले. अपिलीय प्राधिकारी यांचेकडून माहिती मिळाली. पुढेही सहकार्य करण्यास तयार आहे. ७०६/८६ ची झेरॉक्स प्रत प्राप्त दि.२.१२.२०११ रोजी झाली,ङअसे अपीलकर्ता यानी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले आहे.

अपीलकर्त्यानी दस्तऐवज मिळावे, अशी मागणी केली असून नियमातील तरतुदीविषयीची विचारणा केली आहे. जन माहिती अधिकारी यानी विहित मुदतीत उत्तर दिले आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये कागदपत्रांच्या प्रती मिळू शकतात, मात्र मूळ दस्त मिळण्याबाबतची मागणी त्यात येत नाही. हे लक्षात घेता जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २१.०१.२०१२**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.कुमार कोंडिबा गिरीगोसावी
मु.पो.आपटी, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ.आंबेडकर मार्ग, पुणे-१ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ.आंबेडकर मार्ग, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२१९ / २०१० / कोल्हापूर |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाची तारीख | दि.१५.१२.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br>**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,<br>१७, डॉ.आंबेडकर मार्ग, पुणे श्री.शिवाजी पांढरे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने दि.१५.१२.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

अपीलकर्ता यानी सन २०१० मधील प्राथमिक शिक्षण सेवक भरतीपूर्व केंद्रीय निवड परीक्षा-२०१० या परीक्षेच्या उत्तरपत्रिकांच्या छायांकित प्रती व भ.ज.ब. उमेदवारांच्या गुणांची यादी अशी माहिती मागितली होती. यादीसाठीचे शुल्क कळविले. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या निर्णयानुसार उत्तरपत्रिकेच्या प्रती देता

येत नसल्याचे कळविले. अशा उत्तरपत्रिकेच्या प्रती देण्याच्या राज्य माहिती आयोगाच्या, पुणे खंडपीठाच्या निर्णयाविरूध्द परीक्षा परिषदेने केलेल्या रिट याचिकेनुसार मुंबई उच्च न्यायालयाने आयोगाच्या निर्णयास स्थगिती दिली आहे. मात्र सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन विरूध्द आदित्य बंदोपाध्याय व इतर या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने दि.९.८.२०११ रोजी दिलेल्या आदेशाचा विचार करून घ्परीक्षा परिषदेच्या तदर्थ समितीने दि.११.१०.२०११ च्या सभेत ठराव क्र.९७७ द्वारे यापुढील होणाऱ्या परीक्षेपासून प्रत्येक उत्तरपत्रिकेस रू.४००/- शुल्क आकारून त्याच्या झेरॉक्स प्रती देण्याचा निर्णय घेतलेला आहे,ङअसा निर्णय महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने घेतलेला आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, १७, डॉ.आंबेडकर मार्ग, पुणे श्री.शिवाजी पांढरे यानी दि.७.१२.२०११ रोजी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. सार्वजनिक कारभारातील पारदर्शकता हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चा गाभा आहे. आयोगाने महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेस वेळोवेळी त्याची जाणीव दिली होती. या पार्श्वभूमीवर उत्तरपत्रिकांच्या प्रती देण्याबाबतचा परिषदेचा निर्णय स्तुत्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २१.०१.२०१२**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

कु.आनंदा भगवान माने
मु.पो.आपटी, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ.आंबेडकर मार्ग, पुणे-१ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ.आंबेडकर मार्ग, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२२० / २०१० / कोल्हापूर |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाची तारीख | दि.१५.१२.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ.आंबेडकर मार्ग, पुणे श्री.शिवाजी पांढरे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१५.१२.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

अपीलकर्ता यानी मे-२०१० मधील डी.एड., सी.ई.टी. या परीक्षेच्या उत्तरपत्रिकेच्या छायांकित प्रती व खुला प्रवर्ग उमेदवारांच्या गुणांची यादी अशी माहिती मागितली होती. यादीसाठीचे शुल्क कळविले. महाराष्ट्र

राज्य परीक्षा परिषदेच्या निर्णयानुसार उत्तरपत्रिकेच्या प्रती देता येत नसल्याचे कळविले. अशा उत्तरपत्रिकेच्या प्रती देण्याबाबत राज्य माहिती आयोगाच्या, पुणे खंडपीठाने दिलेल्या निर्णयाविरूध्द परीक्षा परिषदेने केलेल्या रिट याचिकेनुसार मुंबई उच्च न्यायालयाने आयोगाच्या निर्णयास स्थगिती दिली आहे. मात्र सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन विरूध्द आदित्य बंदोपाध्याय व इतर या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने दि.९.८.२०११ रोजी दिलेल्या आदेशाचा विचार करून घ्परीक्षा परिषदेच्या तदर्थ समितीने दि.११.१०.२०११ च्या सभेत ठराव क्र.९७७ द्वारे यापुढील होणाऱ्या परीक्षेपासून प्रत्येक उत्तरपत्रिकेस रू.४००/- शुल्क आकारून त्याच्या झेरॉक्स प्रती देण्याचा निर्णय घेतलेला आहे,डअसा निर्णय महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने घेतलेला आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, १७, डॉ.आंबेडकर मार्ग, पुणे श्री.शिवाजी पांढरे यानी दि.७.१२.२०११ रोजी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. सार्वजनिक कारभारातील पारदर्शकता हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चा गाभा आहे. आयोगाने महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेस वेळोवेळी त्याची जाणीव दिली होती. या पार्श्वभूमीवर उत्तरपत्रिकांच्या प्रती देण्याबाबतचा परिषदेचा निर्णय स्तुत्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २१.०१.२०१२**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.मुरलीधर अनंत जोशी
कांचनबन-२, फ्लॅट नं.अ-३०४, शिवतीर्थनगर, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय,
विधान भवन, पुणे-४११००१ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा शिरस्तेदार, विभागीय आयुक्त कार्यालय,
विधान भवन, पुणे-४११००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २११९ / २०१० / पुणे |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाची तारीख | दि.२७.१२.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.मुरलीधर अनंत जोशी
कांचनबन-२, फ्लॅट नं.अ-३०४, शिवतीर्थनगर, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा शिरस्तेदार, विभागीय आयुक्त कार्यालय,
विधान भवन, पुणे प्रतिनिधी श्री.एन.एस.बोडके

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने दि.२७.१२.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

प्रकल्पग्रस्तांसाठी संपादित केलेल्या जमिनीची नुकसानभरपाई, त्यावरील व्याज, जमिनीच्या नोंदीमधील बदल, अशा स्वरूपाच्या मागण्या व त्यावरील कार्यवाही याची माहिती अपीलकर्त्यानी दि.१६.२.२०१० च्या अर्जान्वये केली होती. दि.२०.२.२०१० च्या पत्रान्वये त्यानी उत्तर दिले. घउपविभागीय अधिकारी, वाई तथा भूसंपादन अधिकारी यांच्या स्तरावरील मुद्दे पूर्ण झाले आहेत. तहसीलदार, खटाव यांच्यामार्फत कार्यवाही पूर्ण झालेली नाही. न्यायालयीन स्थगिती आहे. ती उठविण्याबाबत तहसीलदार, खटाव याना तगादा चालू आहे. न्यायालयीन स्थगिती असल्याने जमिनीचा लिलाव तहसीलदार, खटाव यांच्याकडून पूर्ण झालेला नाही,ङअसे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले आहे. त्यानुसार कार्यवाही होण्याची मागणी अपीलकर्ता यानी नमूद केली आहे. घवरीलप्रमाणे माहिती देण्याचे आश्वासन मिळाले आहे. त्यास सहमती आहे,ङअसे त्यानी प्रपत्रात म्हटले आहे, परंतु या सर्व बाबी प्रशासकीय कार्यवाहीच्या असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाहीत. त्यामुळे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील त्याबाबतचा उभय बाजूंच्या चर्चेने घेतलेला निर्णय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत कार्यवाहीचा भाग ठरणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २१.०१.२०१२**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.पांडुरंग दत्तात्रय थिटे
मु.पो.केंदूर, ता.शिरूर, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी (कृषी),
पंचायत समिती, शिरूर, ता.शिरूर, जि.पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, केंदूर,
ता.शिरूर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६२० / २०१० / पुणे |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाची तारीख | दि.२७.१२.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.पांडुरंग दत्तात्रय थिटे
मु.पो.केंदूर, ता.शिरूर, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी (कृषी),
पंचायत समिती, शिरूर, ता.शिरूर, जि.पुणे श्री.एस.एन.खैरे

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, केंदूर, ता.शिरूर, जि.पुणे
श्री.डी.बी.विश्वास

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२७.१२.२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. अनिल ज्ञानू हिप्परकर
मु. पो. शिंगणहळळी, ता. जत, जि. सांगली ४१६ ४०४ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी
विस्तार अधिकारी (पंचायत),पंचायत समिती जत,
मु. पो. शिंगणहळळी, ता. जत, जि. सांगली

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत शिंगणहळळी, ता. जत, जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३०८०/२०१०/सांगली |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाची तारीख | दि. १०/१/२०१२ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी
विस्तार अधिकारी (पंचायत),पंचायत समिती जत,
मु. पो. शिंगणहळळी, ता. जत, जि. सांगली श्री. डी. सी. खाडे

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत शिंगणहळळी, ता. जत, जि. सांगली श्रीमती आर.बी.चव्हाण

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## **विवेचन**

राज्य माहिती आयोगाने दि. १०/१/२०१२ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

सन १९९३ ते २००७ या काळातील विस्तृत माहित अपीलकर्ता यानी मागितली होती. 'भरणा ग्रामपंचायत शिंगणहळळी कडून कळविले नंतर मी मागणी केलेल्या दप्तराची व योजना निहाय कामाची प्रत्यक्ष दप्तर पहावयास मिळाल्यानंतर मी मागणी केलेल्या अर्जाबाबत पूर्ण समाधानी आहे. त्यामुळे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'स मी उपस्थित राहू शकत नाही. तरी माझे संदर्भिय अपील निकाली काढणेस हरकत नाही', असे लेखी निवेदन अपीलकर्ता यानी दिले. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केला.

अपीलकर्ता यांचे लेखी निवेदन विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २५.०१.२०१२**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. बलभिम निवृत्ती हिप्परकर
मु. पो. शिंगणहळळी, ता. जत, जि. सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी
विस्तार अधिकारी (पंचायत),पंचायत समिती जत,
मु. पो. शिंगणहळळी, ता. जत, जि. सांगली

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत शिंगणहळळी, ता. जत, जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३०७९/२०१०/सांगली |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाची तारीख | दि. १०/१/२०१२ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी
विस्तार अधिकारी (पंचायत),पंचायत समिती जत,
मु. पो. शिंगणहळळी, ता. जत, जि. सांगली श्री. डी. सी. खाडे

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत शिंगणहळळी, ता. जत, जि. सांगली श्रीमती आर.बी.चव्हाण

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## <u>विवेचन</u>

राज्य माहिती आयोगाने दि. १०/१/२०१२ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

'मी मागणी केलेल्या दप्तराची व योजना निहाय कामाची प्रत्यक्ष दप्तर पहावयास मिळाल्यानंतर मी मागणी केलेल्या अर्जाबाबत पूर्ण समाधानी आहे. त्यामुळे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'स उपस्थित राहू शकत नाही. तरी माझे संदर्भिय अपील निकाली काढणेस हरकत नाही', असे लेखी निवेदन अपीलकर्ता यानी दिले. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीचा तपशील सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केला.

अपीलकर्ता यांचे लेखी निवेदन विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २५.०१.२०१२**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. सुरगोंडा आण्णा पाटील
१६९०, लाळगे गल्ली, खणभाग, पंचमुखी मारुती रोड,
ता. मिरज. जि. सांगली- ४१६ ४१६ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गट शिक्षणाधिकारी,
पंचायत समिती, वाळवा- इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली
उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य लिपिक (शिक्षण विभाग),
पंचायत समिती, वाळवा- इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३०११/२०१०/सांगली |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाची तारीख | दि. १०/१/२०१२ |

**३. उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य लिपिक (शिक्षण विभाग),
पंचायत समिती, वाळवा- इस्लामपूर, ता. वाळवा,
जि. सांगली श्री. एस. आर. गावडे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १०/१/२०१२ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

विशिष्ट कालावधीचा पगार आपल्याला का देण्यात आला नाही व व्याजासह ती रक्कम कधी देणार, अशी विचारणा अपीलकर्ता यानी केली होती. त्यांची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. तथापि याबाबतचे स्पष्टीकरणात्मक उत्तर त्याना देण्यात आले आहे, असे लेखी निवेदन जन माहिती अधिकारी यानी पूरक कागदपत्रांसह आयोगास सादर केले. त्यानी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २५.०१.२०१२**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. विश्वास रावसाहेब भोसले
१४८१, रिसाला रोड, सांगली ४१६ ४१६ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप आयुक्त,
सामान्य प्रशासन विभाग, विभागीय आयुक्त कार्यालय,
पुणे विधान भवन, पुणे - १

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार,
सामान्य प्रशासन विभाग, विभागीय आयुक्त कार्यालय,
पुणे विधान भवन, पुणे - १

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६१६/२०१०/सांगली |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाची तारीख | दि. १०/१/२०१२ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप आयुक्त,
सामान्य प्रशासन विभाग, विभागीय आयुक्त कार्यालय,
पुणे विधान भवन, पुणे श्री. तुकाराम पवार

**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार (सामान्य शाखा)
सामान्य प्रशासन विभाग, विभागीय आयुक्त कार्यालय,
पुणे विधान भवन, पुणे श्रीमती पल्लवी घाटगे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १०/१/२०१२ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

'अर्जदार यांचा अर्ज दि. ३१/३/२०१० रोजी प्राप्त झाला. त्या अनुषंगाने सदरचा अर्ज जिल्हा क्रिडा अधिकारी, कोल्हापूर यांच्याकडे माहिती देण्यासाठी दि. २३/४/२०१० रोजी पाठविण्यात आला व अर्जदार याना तसे कळविण्यात आले',असे जन माहिती अधिकारी यानी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले आहे.+

'जिल्हा क्रिडा अधिकारी यानी अर्जदार याना दि. ३१/७/२०१० रोजी माहिती देऊन या कार्यालयास अवगत केले आहे',असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पूरक कागदपत्रांसह सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले आहे. त्यानी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २५.०१.२०१२**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्रीमती उषा आबा अहिवळे
११५ अ, मंगळवार पेठ, दैनिक गंधवार्ता शेजारी,
फलटण, जि. सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा कृषी अधिकारी सातारा,
प्रशासकीय इमारत, एस.टी.स्टॅंड समोर, सातारा

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा अधीक्षक,
प्रशासकीय इमारत, एस.टी.स्टॅंड समोर, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८०१/२०१०/सातारा |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाची तारीख | दि. १०/१/२०१२ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा कृषी अधिकारी सातारा,<br>प्रशासकीय इमारत, एस.टी.स्टॅंड समोर, सातारा श्री. सुरेश अनंत मगदूम | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## <u>विवेचन</u>

राज्य माहिती आयोगाने दि. १०/१/२०१२ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

अर्जात विविध कॉमेट मध्ये माहिती मागणी असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ अन्वये देय नाही. तालुका कृषी अधिकारी, पाटण कार्यालयाकडूनसुध्दा वेगवेगळया प्रपत्रात माहिती मागणी केल्याने त्यांचेकडील पत्र क्र. २९९ दि. २६/२/२०१० अन्वये कळविलेले आहे. सदर अर्जातील माहिती देण्यासाठी मोठया प्रमाणात मनुष्यबळ व साधनसामग्रीचा वापर होणार असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २ नुसार माहिती देणे शक्य नाही, असे अपीलकर्ता याना कळविण्यात आले आहे. जन माहिती अधिकाऱ्यांना समज देण्यात आली असून तालुका कार्यालयाकडून माहिती देण्यात आली आहे, असे अपिलीय प्राधिकारी यानी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यांच्या दि. २३/२/२०१० च्या अर्जाला जन माहिती अधिकारी यानी दि. २६/२/२०१० च्या पत्रान्वये दिलेले उत्तर योग्य आहे. सरसकट व अत्यंत विस्तृत स्वरुपाची मागणी अपीलकर्ता यानी केली असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ७ (९) अन्वये ती नाकारता येऊ शकते. तसेच अपीलकर्त्यानी दिलेल्या विशिष्ट नमुन्यात माहिती संकलित करुन देणे जन माहिती अधिकाऱ्यांवर बंधनकारक नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २५.०१.२०१२**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. सत्वशील धैर्यशील शेळके
इंद्रप्रस्थ बिल्डिंग, शिरवळ रोड, रा. लोणंद, ता. खंडाळा, जि. सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
बी बरॅक, मध्यवर्ती इमारत परिसर, कॅम्प,
सार्वजनिक बांधकाम पूर्व विभाग, पुणे ४११ ००१

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपकार्यकारी अभियंता,
बी बरॅक, मध्यवर्ती इमारत परिसर, कॅम्प,
सार्वजनिक बांधकाम पूर्व विभाग, पुणे ४११ ००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८२६/२०१०/सातारा |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाची तारीख | दि. १०/१/२०१२ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. सत्वशील धैर्यशील शेळके
इंद्रप्रस्थ बिल्डिंग, शिरवळ रोड, रा. लोणंद, ता. खंडाळा, जि. सातारा

**जन माहिती अधिकारी** तथा उपकार्यकारी अभियंता,
बी बरॅक, मध्यवर्ती इमारत परिसर, कॅम्प, सार्वजनिक बांधकाम पूर्व विभाग,
पुणे श्रीमती उज्ज्वला संतोष घावटे

४ माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे.

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १०/१/२०१२ रोजी आयोजित केलेल्या ‘विशेष अपील निर्गत कार्यक्रमा’त या अपिलाचा समावेश होता.

पंढरपूर ते फलटण, लोणंद ते शिरवळ या मार्गाच्या चौपदरीकरणाचे रस्ते ज्या जागेतून जाणार त्याचा ७/१२ उतारा व पूर्तता अहवाल देण्याची मागणी अपीलकर्ता यांनी केली आहे.

'जन माहिती अधिकारी यानी दि. ५/३/२०१० च्या अर्जातील माहिती उपलब्ध करुन देणेसाठी रु. २००/-शुल्क भरण्यासाठी अर्जदारास दि. २५/३/२०१० रोजी कळविले. अपीलकर्त्याने कामाचे आखणी नकाशे मागितले होते. सद्यस्थितीत आखणीचे प्रारुप नकाशे तयार असून अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेआहेत. त्यामुळे अर्जदारास माहिती नाकारलेली नाही. अंतीम नकाशे मोजणी पूर्ण झाल्यानंतर व आखणी निश्चित झाल्यावर सशुल्क उपलब्ध करुन देण्यात येतील, असे जन माहिती अधिकारी यानी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले आहे. अपिलीय प्राधिकारी यानी याबाबतचे तपशीलवार लेखी निवेदन सादर केले आहे.

'मला प्रारुप आरेखन नकाशा प्रत मिळाली. जागेवरील प्रत्यक्ष मोजणी झाल्यानंतर अंतिम आरेखन नकाशा व ज्या जागेतून जाणार त्याचे ७/१२ उतारे मिळावेत व पूर्तता अहवाल मिळावा', असे अपीलकर्ता यानी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले आहे.

अपीलकर्त्यास माहिती देण्याबाबत जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे. अपीलकर्त्याने प्रपत्रात केलेल्या नोंदी लक्षात घेता त्यांची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून या बाबी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २५.०१.२०१२**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. रामदास आनंदा साठे
मु. पो. आष्टा, ता. वाळवा, जि. सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती कवठेमहांकाळ, ता. कवठेमहांकाळ, जि. सांगली

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत रायवाडी, कवठेमहांकाळ, ता. कवठेमहांकाळ, जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३०८२/२०१०/सांगली |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाची तारीख | दि. १०/१/२०१२ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती कवठेमहांकाळ, ता. कवठेमहांकाळ,
जि. सांगली श्री. दिलीप परशुराम शिंदे

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत रायवाडी, कवठेमहांकाळ, ता. कवठेमहांकाळ,
जि. सांगली श्री. दिलीप तानाजी मोहिते

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## **विवेचन**

राज्य माहिती आयोगाने दि. १०/१/२०१२ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

'ग्रामपंचायत रायवाडी, कवठेमहांकाळ, ता. कवठेमहांकाळ, जि. सांगली यांच्याकडील घरकुल वाटपाबाबत ग्रामपंचायतीकडील सर्व दप्तर मी स्वतः पाहिले असून माझे पूर्ण समाधान झालेले आहे. भ्रष्टाचार झाला नसल्याचे मला आढळून आले आहे. कोणतीही तक्रार राहिलेली नाही', असा मुद्देनिहाय लेखी जबाब अपीलकर्ता यानी दि. ५/१/२०१२ रोजी दिला असून जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी त्याची प्रत सादर करुन प्रस्तुत माहितीबाबत केलेल्या कार्यवाहीचा तपशील नोंदविला. अपीलकर्त्याचा जबाब लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढील प्रमाणेः

## **आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २५.०१.२०१२**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. विलास बाबुराव सगरे
मु. पो. लेंगरे, ता. खानापूर, जि. सांगली - ४१५ ३०९ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, नगरपालिका इमारत,
संवसु विभाग, विटा, जि. सांगली ४१५ ३११

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, नगरपालिका इमारत,
संवसु विभाग, विटा, जि. सांगली ४१५ ३११

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३०७६/२०१०/सांगली |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाची तारीख | दि. १०/१/२०१२ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. विलास बाबुराव सगरे
मु. पो. लेंगरे, ता. खानापूर, जि. सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, नगरपालिका इमारत,
संवसु विभाग, विटा, जि. सांगली श्री. डी. एस. कांबळे

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, नगरपालिका इमारत,
संवसु विभाग, विटा, जि. सांगली श्री. वि. प. इदाते

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## <u>विवेचन</u>

राज्य माहिती आयोगाने दि. १०/१/२०१२ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

'हेतुपुरस्सर माहिती देणेस टाळाटाळ, अपुरी व खाडाखोड व खोटी माहिती देणे, आजपर्यंत माहिती न देणे', असे अपीलकर्ता यानी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले आहे.

'अर्जदाराने मागितलेली माहिती ही 'माहिती' या सदरात न मोडणारी असून त्यामध्ये कॉलम १ ते १५ प्रमाणे माहिती तयार करुन भरावी लागणार आहे. सदर माहिती लिहताना खाडाखोड जरी झाली असली तरी सदर माहितीवर प्रतिस्वाक्षरी देण्यास तयार असून त्याबाबत त्याना कोणतेही दस्तऐवज दाखविण्यास तयार आहोत अथवा सत्यप्रत देण्यास तयार आहोत. माहिती वेळेत दिलेली आहे. अपिलात आल्यानंतर चर्चेस बोलावून शंकानिरसन करणेत येऊन आणखी हवी असलेली माहिती देणेत आली',असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले आहे. त्याचा तपशील स्वतंत्रपणे सादर केला आहे.

उभय बाजूंनी प्रपत्रात केलेल्या नोंदी व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यांच्या मागणीनुसार विशिष्ट नमुन्यात माहिती संकलित करुन देणे जन माहिती अधिकाऱ्यांवर बंधनकारक नाही. तरीही जन माहिती अधिकारी यानी माहिती संकलित करुन दिली असून खाडाखोडीचे स्पष्टीकरण केले आहे व 'माहिती खरी आहे', असे लेखी दिले आहे. या संदर्भात अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास अभिलेखांचे अवलोकन करुन हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती योग्य ते शुल्क भरुन प्राप्त करुन घेता येईल. आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २५.०१.२०१२**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. शांतीलाल जुगराज कावेडिया
६६९, रविवार पेठ, पुणे ४११ ००२ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त,
विभागीय कार्यालय क्र. १, पुणे महानगरपालिका,
शिवाजीनगर, पुणे ४११ ००५

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उपअभियंता,
विभागीय कार्यालय क्र. १, पुणे महानगरपालिका,
शिवाजीनगर, पुणे ४११ ००५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०८४/२००९/पुणे |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाची तारीख | दि. १७/११/२०११ |
| ३ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १७/११/२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

प्रस्तुत अपिलाच्या सुनावणीस अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित होते

अपीलकर्ता श्री. शांतीलाल जुगराज कावेडिया यानी बेकायदेशीर बांधकामावरील कारवाईच्या अनुषंगाने कायदेशीर तरतुदींच्या अन्वयार्थाच्या स्वरुपाची विचारणा केली होती. संबंधित विभागाकडे अर्ज वर्ग करुन माहिती मागविली. दरम्यानच्या काळात अपीलकर्त्यांनी प्रथम अपील केले. त्याच सुनावणी दरम्यान अपीलकर्त्यांना आमच्या कार्यालयाकडून अपेक्षित असलेली माहिती कळविल्यावरुन त्यानुसार आदेश दिले व अपीलकर्त्यास माहिती हातोहात देण्यात आली, असे लेखी निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, विभागीय कार्यालय क्र. १, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. विजय दहिभाते यानी सादर केले.

अपीलकर्त्यानी केलेली विचारणा कायदेशीर बार्बीविषयीचे स्पष्टीकरण अथवा अन्वयार्थाची मागणी अशी असून ती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या 'माहिती'च्या व्याख्येत येत नाही. मात्र अर्ज अन्य जन माहिती अधिकाऱ्यांकडे वर्ग करण्याबाबत काटेकोरपणे तपासून नंतरच व अधिनियमातील मुदतीत कार्यवाही केली गेली पाहिजे, याची समज जन माहिती अधिकारी तथा नगर उप अभियंता, विभागीय कार्यालय क्र. १, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. आर. एम. शेळकंदे याना देण्यात येत आहे .

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २१.०१.२०१२**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. मारुती भाऊ कांबळे
मु. पो. आरळा, ता. शिराळा, जि. सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय, शिराळा, ता. शिराळा, जि. सांगली

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा पुरवठा अव्वल कारकुन शिराळा,
ता. शिराळा, जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३२५९/२०१०/सांगली |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाची तारीख | दि. १०/१/२०१२ |

**३. उपस्थित**

श्री. मारुती भाऊ कांबळे
मु. पो. आरळा, ता. शिराळा, जि. सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय, शिराळा, ता. शिराळा, जि. सांगली यांचे वतीने श्री.एस.एम.यादव

**जन माहिती अधिकारी** तथा पुरवठा अव्वल कारकुन शिराळा,
ता. शिराळा, जि. सांगली श्री. टी.एल.कुंभार

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १०/१/२०१२ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

'सर्वसामान्य गरीब लोकांना व दारिद्रय रेषेतील लोकांना धान्य आजपर्यंत मिळत नसलेने जनतेला तिच्या हक्काच्या गोष्टी मिळाव्यात. सन २००६ पासून कार्डधारकांची लालासोा रहिमान डांगे या रास्तभाव दुकानदाराकडून पिळवणूक सुरु आहे आणि प्रशासन त्याना पाठीशी घालत असलेने कार्डधारकांच्या अन्यायाचे परिमार्जन व्हावे व सार्वजनिक लोकहिताच्या दृष्टीने तत्कालीन तहसीलदार यांच्या आदेशाची अंमलबजावणी व्हावी व कार्डधारकांना न्याय मिळावा, ही विनंती व संबंधित अधिकाऱ्यांवर योग्य ती कार्यवाही करावी', अशी मागणी अपीलकर्ता यानी लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

'अर्जदार यांच्या दि. २३/६/२०१० च्या अर्जावर दि. १२/७/२०१० रोजी माहिती (वेळेत) देण्यात आली आहे', असे जन माहिती अधिकारी यानी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले आहे.

'सदर अपील निकाली काढणेत यावे', असे अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात संयुक्तपणे नमूद केले आहे.

अपीलकर्त्याची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २५. ०१.२०१२**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. अल्लाउद्दीन काशीम अत्तार
मु. पो. आळते, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपनिबंधक,
सहकारी संस्था, हातकणंगले, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर
उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहकार अधिकारी (श्रेणी-२),
उपनिबंधक, सहकारी संस्था, हातकणंगले यांचे कार्यालय,
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव,
महावीर खाण मजूर सहकारी संस्था मर्या.,
मु. पो. आळते, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८८१/२०१०/कोल्हापूर |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाची तारीख | दि. १५/१२/२०११ |

**३. उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा सहकार अधिकारी (श्रेणी-२),
सहकारी संस्था, हातकणंगले यांचे कार्यालय,
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर श्री. आर.बी.बारडे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १५/१२/२०११ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

'अपीलकर्ता यानी दि. १७/२/२०१० रोजी २ मुद्दयांची माहिती मागितली होती. सदरच्या अर्जावर तत्कालीन जन माहिती अधिकारी यानी दि. १५/३/२०१० च्या पत्रान्वये कार्यालयात उपलब्ध असणारी माहिती समक्ष उपस्थित राहून घेऊन जाणेबाबत कळविले होते. तथापि वेळेत माहिती न मिळाल्याच्या कारणावरुन अपीलकर्ता यानी अपील केले. मुद्दा क्र.१ ची माहिती संस्था नोंदणी वेळेची 'अ' धारिका विनामूल्य देणेबाबत दि. ५/७/२०१० रोजी अपिलीय प्राधिकारी यानी आदेश दिले. मुद्दा क्र. २ ची माहिती मोघम स्वरुपाची असून या कार्यालयाच्या अभिलेख कक्षात नसल्याने देता आली नाही. दि. ५/७/२०१० च्या आदेशान्वये अपीलकर्ता संबंधित माहिती दि. १६/७/२०१० रोजी उपस्थित राहून घेऊन गेले आहेत', असे लेखी निवेदन अपिलीय प्राधिकारी यानी सादर केले. अपीलकर्त्यांची माहितीची पोहोच असलेल्या पत्राची प्रत जन माहिती अधिकारी यानी सादर केली.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २५.०१.२०१२**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. अशोक राजाराम पाटील
रा. कवडेएकंद, ता. तासगाव, (सिध्दराजगरेज), जि. सांगली अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा अधीक्षक,
भूमी अभिलेख, सांगली यांचे कार्यालय, मार्केट यार्ड, जि. सांगली
उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपअधीक्षक,
भूमी अभिलेख, सांगली यांचे कार्यालय, मार्केट यार्ड, जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३०१४/२०११/सांगली |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाची तारीख | दि. १०/१/२०१२ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा अधीक्षक,
भूमी अभिलेख, सांगली यांचे कार्यालय, मार्केट यार्ड,
जि. सांगली श्री. यशवंत गोपाळ नाडगौडा

**जन माहिती अधिकारी** तथा उपअधीक्षक,
भूमी अभिलेख, सांगली यांचे कार्यालय, मार्केट यार्ड,
जि. सांगली यांचे प्रतिनिधी श्री. अ. द. कदम

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## **विवेचन**

राज्य माहिती आयोगाने दि. १०/१/२०१२ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

अपीलकर्त्यांनी मागितलेल्या माहितीबाबत विहित मुदतीत शुल्क कळविले. शुल्क भरल्यानंतर उपलब्ध कागदपत्रांच्या प्रती पुरविल्या. एका पत्राची प्रत व जावक क्रमांक कसून शोध घेऊनही उपलब्ध न झाल्यामुळे अपीलकर्त्यास तसे कळविले. सन १९८८ ते १९९० या कालावधीतील ही कागदपत्रे आहेत, असे तपशीलवार लेखी निवेदन जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सादर केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता त्यांचे प्रतिपादन मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २५.०१.२०१२**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्री.संजय शिवाजी महाबोले
मु.पो.ता.माढा, जि.सोलापूर **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय माढा,
ता.माढा,जि.सोलापूर **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय माढा,
ता.माढा,जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३४९/२०१०/सोलापूर |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाची तारीख | दि.१५.१२.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,<br>तहसील कार्यालय माढा,<br>ता.माढा,जि.सोलापूर श्री.एस.पी.कुलकर्णी | |
| ४ | महिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**<u>विवेचन</u>**

राज्य माहिती आयोगाने दि. १५.१२.२०११ रोजी आयोजित केलेल्या घविशेष अपील निर्गत कार्यक्रमाङमध्ये या अपिलाचा समावेश होता.

घ्मी तहसीलदार, माढा यांजकडे माढा येथील चेअरमन, माढा कन्झ्युमर्स सोसायटी रास्त भाव धान्य दुकानाचे सन २००४-०५ या कालावधीतील धान्याच्या चलनाच्या प्रतीची मागणी केलेली होती. सदरहू माहिती मुदतीत न मिळलेने द्वितीय अपील अपिलीय प्राधिकारी यांचेकडे दि.०९.०४.२०१० रोजी अपील दाखल केलेले होते. अपिलीय प्राधिकारी यांनी दि.१२.०५.२०१० रोजीचे आदेशान्वये सदरची माहिती विनामूल्य देणेबाबत आदेशित केलेले होते. त्या अनुषंगाने चेअरमन, माढा कन्झ्युमर्स सोसायटीचे सन २००४-०५ चे चलनाच्या प्रती मला मिळालेल्या आहेत. त्यामुळे माझी तक्रार संपुष्टात आलेली असल्याने आपलेकडील अपील निकाली काढणेत यावेङ अशी विनंती अपीलकर्त्याने लेखी निवेदनाद्वारे त्यांची विनंती मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. २७.०१.२०१२**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्री.गुलामहुसेन कासीमसाहेब शेख
६१०/११, उत्तर कसबा जि.सोलापूर **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, जि.सोलापूर **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा सहायक उपनिबंधक,
सहकारी संस्था, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १००२/२०१०/सोलापूर |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाची तारीख | दि.१५.१२.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,<br>सहकारी संस्था, जि.सोलापूर | |
| ४ | महिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने दि. १५.१२.२०११ रोजी आयोजित केलेल्या घविशेष अपील निर्गत कार्यक्रमाङमध्ये या अपिलाचा समावेश होता.

योग्य ते शुल्क भरुन माहिती घेऊन जाणेबाबत दि.०८.०१.२०१० च्या अर्जावर दि.०४.०२.२०१० रोजीच्या पत्रान्वये कळविले असतानाही अपीलकर्ते श्री.शेख अद्याप माहिती घेऊन गेले नाहीत, असे अपिलीय

प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर यांनी त्यांच्या दि.१४.१२.२०११ रोजीच्या तपशीलवार लेखी निवेदनात नमूद केले आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यांनी माहिती हवी असल्यास शुल्क भरुन प्राप्त करुन घेतली पाहिजे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. २७.०१.२०१२**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्री.नितीन शहाजी कदम
मु.पो.वेळापूर (शेरी नं-२),
ता.माळशिरस,जि.सोलापूर **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कुलसचिव,
पुणे विद्यापीठ, गणेशखिंड रोड, पुणे **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
पुणे विद्यापीठ, गणेशखिंड रोड, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११८२/२०१०/सोलापूर |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाची तारीख | दि.१५.१२.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**जन माहिती अधिकारी,**<br>पुणे विद्यापीठ,<br>गणेशखिंड रोड, पुणे श्रीमती अरुणा विजय चव्हाण व मेघना सावंत भोसले | |
| ४ | महिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १५.१२.२०११ रोजी आयोजित केलेल्या घविशेष अपील निर्गत कार्यक्रमाडमध्ये या अपिलाचा समावेश होता.

अपीलकर्ता यांनी मुळ अर्जान्वये केलेली नोव्हेंबर २००९ मधील एल.एल.बी. परीक्षेतील उत्तरपत्रिकेबाबतची मागणी ही परीक्षेचा निकाल जाहीर होण्यापूर्वीच केलेली असल्याने, तसेच उत्तरपत्रिका ही विद्यापीठाचे ऑर्डिनन्स क्र.१८२ अन्वये पुरवली जात असल्याबाबतची माहिती ही अर्जदाराला देण्यात आली होती. त्याचप्रमाणे उत्तरपत्रिका जतन करण्याचा कालावधी हा निकाल जाहीर झाल्यापासून ६ महिने करिताच असल्याने प्रस्तुतचे अपील निकाली काढण्यात यावे, असे जन माहिती अधिकारी यांनी सदर कार्यक्रमाच्या प्रपत्रात नमूद केले आहे. जन माहिती अधिकारी, पुणे विद्यापीठ, पुणे यांनी मुदतीत कार्यवाही केली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. २७.०१.२०१२**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्री.सुनिल गणपत रकटे
१४१/नाईकचाळ, बोपोडीगांव,
ता.हवेली, जि.पुणे ४११ १२० **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय शिरुर, ता.शिरुर, जि.पुणे **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय शिरुर, ता.शिरुर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८४५/२०१०/पुणे |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाची तारीख | दि.२७.१२.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता -** श्री.सुनिल गणपत रकटे<br>१४१/नाईकचाळ, बोपोडीगांव,<br>ता.हवेली, जि.पुणे ४११ १२०<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा** तहसीलदार<br>तहसील कार्यालय शिरुर, ता.शिरुर, जि.पुणे श्री.अतुल प्र. म्हेत्रे<br><br>**१. जन माहिती अधिकारी तथा** निवासी नायब तहसीलदार,<br>तहसील कार्यालय शिरुर, ता.शिरुर, जि.पुणे श्री.ऋषीकेत कां.शेळके<br><br>**२. जन माहिती अधिकारी तथा** तलाठी,<br>रांजणगाव सांडस,ता.शिरुर,जि.पुणे श्री.रविंद्र पी.जाधव | |
| ४ | महिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. २७.१२.२०११ रोजी आयोजित केलेल्या घविशेष अपील निर्गत कार्यक्रमाङमध्ये या अपिलाचा समावेश होता.

घमाहिती देण्यास विलंब झाला असून तरीही अपिलीय अधिकारी सहकार्य करुन माहिती देण्यास तयार आहेत. संपूर्ण माहिती मिळाल्यानंतर अपील निकाली काढण्यात यावेङ, असे अपीलकर्ता यांनी घविशेष अपील निर्गत कार्यक्रमाङच्या प्रपत्रात नमूद केले आहे.

श्री.सुनिल गणपत रकटे यांनी या कार्यालयाकडे दि.०६.०२.२०१० रोजी मौजे रांजणगाव सांडस येथील जमीन गट नं.६२० बाबतच्या माहितीची विचारणा केली होती. अर्जदाराचा अर्ज हा गाव कामगार तलाठी, रांजणगाव सांडस यांचे कार्यालयाशी निगडित असलेने त्याच दिवशी गाव कामगार तलाठी, रांजणगाव सांडस यांना वर्ग करण्यात आला. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी तत्कालीन गाव कामगार तलाठी, रांजणगाव सांडस हे जन माहिती अधिकारी आहेत व तत्कालीन गाव कामगार तलाठी श्री.व्ही.एस.टकले यांनी अर्जदारास मुद्देनिहाय माहिती दिलेली आहे. तथापि पुनर्वसनबाबत महसुली कामकाजामध्ये अर्ज करण्याचे त्यानी मान्य केले. अपिलार्थी यांनी माहितीच्या अधिकारान्वये पुनर्वसन जमिनीविषयक प्रश्नार्थक स्वरुपाची मागणी केली आहे. सदर माहिती ही माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मध्ये मोडत नाही, असे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय शिरुर, जि. पुणे यांनी लेखी निवेदनात व तेच सारांश रुपात प्रपत्रात नमूद केले आहे.

सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. २७.०१.२०१२**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,**
**नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,**
**कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१**

श्री.आशिष सूर्यकांत कोरी
897, माने सदनिका, विनायक चौक, **अपीलकर्ता**
सेना मंदिर रोड, गावभाग,
सांगली-416 416

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त,**
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका,
सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कर निर्धारक व कर संकलक,**
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका,
सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | 714/2009/सांगली |
| २ | अपिलासोबत मूळ माहिती- मागणी अर्जाची जोडपत्रा-अ ची छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

विवेचन

'माझ्या माहिती-मागणी अर्जातील माहिती मला मिळाली असून माझी कोणतीही तक्रार नाही. माझे अपील निकाली काढण्यास हरकत नाही', असे निवेदन अपीलकर्ता श्री.आशिष सूर्यकांत कोरी यानी दि.4.11.2011 रोजीच्या पत्रान्वये आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.

दि :-27.1.2012

(विजय कुवळेकर )

राज्य माहिती आयुक्त,

पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

**राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,**
**नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,**
**कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१**

श्री.अशोक मंजुराम शिंदे
प्लॉट नं.12, साई ओम अपार्टमेंट, **अपीलकर्ता**
भवानी पेठ, दत्त मंदिरासमोर,
सोलापूर

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक,** **उत्तरवादी**
भूमि व मालमत्ता कार्यालय, सोलापूर महानगरपालिका,
इंद्रभुवन, पुण्यश्लोक आप्पासाहेब वारद पथ, रेल्वे लाईन्स,
सोलापूर-413 001

| | | |
|---|---|---|
| १ | **अपील क्रमांक** | 3036/2011/सोलापूर |
| 2 | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी** :- रिट पिटीशन क्र.5013/1997 वरील उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या कार्यवाहीबाबत | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.अशोक मंजुराम शिंदे यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबतची कागदपत्रे विचारात घेता माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(१) अन्वये अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे प्रथम अपील केल्याचे दिसून येत नाही. सबब या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही. अपीलकर्त्याने मर्जीतर वरील कागदपत्रे व शुल्क जोडून अपील फेर सादर करावे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- 27.1.2012**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

**राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,**
**नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,**
**कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१**

श्री.इलियास इब्राहिम शेख
गजानन नगर, प्लॉट नं.134, **अपीलकर्ता**
सहारा नगर जवळ, मजरेवाडी, होटगी रोड,
सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय),**
सोलापूर ग्रामीण, यांचे कार्यालय,
सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक,**
सोलापूर ग्रामीण, यांचे कार्यालय,
सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | **अपील क्रमांक** | 3047/2011/सोलापूर |
| 2 | अपिलासोबत माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली नसल्याने अपेक्षित असणा-या माहितीचा बोध होत नाही. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.इलियास इब्राहिम शेख यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायाप्रत, तसेच योग्य ते शुल्क (रु.२०/- चे मुद्रांक अथवा पोस्टल ऑर्डर ) जोडलेले नसल्याने या अपिलावर कार्यवाही

करण्यात येणार नाही. अपीलकर्त्याने मर्जीतर वरील कागदपत्रे व शुल्क जोडून अपील फेर सादर करावे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- 27.1.2012**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**